१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | बुधवार | दि. २८ ऑक्टोबर २०२६ | अंक १४२ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

मेहेर यार्ड कंपनीविरोधात गेट बंद आंदोलन

उरण : खोपटे येथील मास्टर मरीन मेहेर यार्ड कंपनीविरोधात स्थानिक रोजगाराच्या प्रश्नावर तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी गुरुवारी (दि.२९) सकाळी ११ वाजल्यापासून गेट बंद आंदोलन करण्यात येणार आहे. मोठेखार प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटना खोपटे बांधपाडा यांच्या माध्यमातून अजित म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार असून, प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटना व स्थानिक नागरिकांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा आणि स्थानिकांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागावा, अशी मागणी करण्यात येणार आहे. कंपनीच्या प्रकल्पांमध्ये स्थानिक •➤पान २ वर

आज कर्जतमध्ये महासभा

कर्जत : कर्जत तालुक्यात टोरंट पॉवर कंपनीच्या प्रकल्पासाठी होत असलेल्या वृक्षतोडीविरोधातील आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळू लागला आहे. शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि विविध पर्यावरणवादी संघटना या मुद्द्यावर एकत्र आल्या आहेत. बुधवारी (दि.२८) टोरंट पॉवर कंपनीच्या वृक्षतोडीविरोधात कर्जतमध्ये सभा आणि स्थळ पाहणी होणार आहे. या सभेला शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील उपस्थित राहणार आहेत. कर्जत आणि खालापूर तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

काशिद जेट्टीचा प्रकल्प फेल


प्रमोद जाधव
| रायगड जिल्हा |

प्रकल्प पूर्ण करण्यास ठेकेदार अपयशी

रो-रो सेवेची पर्यटकांना करावी लागणार प्रतीक्षा

पर्यटनाला चालना देण्याबरोबरच मुंबई ते मुरूडचा प्रवास कमी वेळेत व्हावा; म्हणून काशीद येथे रो-रो प्रकल्पाचे स्वप्न दाखविण्यात आले. मात्र काशिदमधील या जेट्टीचा प्रकल्प फेल ठरल्याची बाब समोर आली आहे. करोडो रुपये खर्च करून बांधण्यात आलेला बंधारा फुटून गेला आहे. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिकांची काशिद-मुंबई रो-रो सेवा लांबणीवर गेली आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या उदासीनतेमुळे स्थानिकांना याचा मोठा फटका बसत आहे.

रायगड जिल्हयातील काशिद हा समुद्रकिनारा पर्यटकांसाठी कायमच आकर्षक ठरणार आहे. जगाच्या नकाशात काशिद समुद्र किनाऱ्याला प्रचंड महत्व प्राप्त झाले आहे. वर्षाला दोन लाखहून अधिक पर्यटक काशिदमध्ये फिरण्यासाठी येतात. काशिद समुद्रकिनारी फिरण्याचा आनंद पर्यटक मनमुरादपणे लुटतात. मुंबई येथून मांडवा त्यानंतर मांडव्यावरून वाहनाने अलिबागमार्गे काशिदला पोहचतात. त्यामुळे पर्यटकांना अलिबागहून काशिदला जाण्यासाठी तीन तास अधिक मोजावे लागतात. प्रवासात वेळ जात असल्याने पर्यटकांना किनारी फिरण्याचा आनंद घेण्यास जास्त वेळ मिळत नाही.



पुनरावलोकन करण्याची वेळ

मुरुड तालुक्यातील पर्यटनदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या काशिद जेट्टी प्रकल्पाचे काम रखडल्यामुळे आणि त्यातील विविध तांत्रिक आव्हानांमुळे आता या प्रकल्पाचे आणि परिसराचे सखोल संशोधन व पुनरावलोकन केले जात आहे. मुंबई ते काशिद दरम्यान थेट जलमार्गाच्या प्रकल्पासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होऊनही प्रकल्पाचे काम अपेक्षित गतीने पूर्ण होऊ शकले नाही.समुद्रातील भौगोलिक परिस्थिती आणि बांधकामातील तांत्रिक अडचणींचा अभ्यास करण्यासाठी संशोधनात्मक पातळीवर पुनरावलोकन करण्याची वेळ महाराष्ट्र सागरी मंडळावर आली आहे.

पर्यटकांचा हा त्रास कमी करण्यासाठी मुंबई ते काशिद रो-रो सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मांडवा ते भाऊचा धक्का या यशस्वी प्रकल्पानंतर केंद्र शासनाने सागरमाला योजनेअंतर्गत मुंबई ते काशिद रो-रो सेवा सुरू करण्याचा प्रयत्न सुरु केला. २०१९ पासून या कामाची हालचाल सुरू झाली. सहा वर्षापासून काशिद समुद्रकिनारी या प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले. समुद्राच्या लाटा थांबविण्यापासाठी ब्रेक वॉटर बंधाऱ्यासह रो-रो जेट्टी, प्रवासी जेटी, टर्मिनल निर्माण करण्याचे काम सुरू केले. ११२ कोटी रुपयांचे हे प्रकल्प असून मागील वर्षापर्यंत ९९.९६ कोटी रुपये खर्च झाले असल्याची माहिती समोर आली आहे. •➤पान २ वर

वेधक

आदिवासी बांधवाचा संशयास्पद मृत्यू

पनवेल : खारघर शहरातील बेलपाडा येथील आदिवासी बांधवांच्या घरावर सिडकोच्या अतिक्रमण विभागाने २७ ऑक्टोबर रोजी कारवाई केली. या कारवाईदरम्यान एका आदिवासीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली. त्यामुळे दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी मृत बाळाराम कांबडी (६०) यांच्या नातेवाईकांनी पोलिसांकडे केली. २७ ऑक्टोबर रोजी सकाळच्या सुमारास सिडकोच्या अतिक्रमण विभाग बेलपाडा आदिवासी वाडी जवळ धडकले. यावेळी कारवाई सुरू असताना एका घरामध्ये बाळाराम कांबडी यांचा मृतदेह आढळला. सिडकोच्या अतिक्रमण विभागाची कारवाई सुरू असताना जेसीबीचा फावडा लागल्याने बाळाराम कांबडी यांचा मृत्यू झाला असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला •➤पान २ वर

एसटी कामगार आंदोलनाच्या पवित्र्यात

नागपूर : दिवाळीपूर्वी प्रलंबित आर्थिक मागण्या पूर्ण न झाल्यास एसटी कामगार आंदोलनाच्या पवित्र्यात आहे. महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या वतीने ३ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन मिळणे, २५ हजार रुपये दिवाळी भेट मिळणे, १२ हजार ५०० रुपये सणासाठी, २०१६ पासूनची वार्षिक वेतनवाढ व घरभाडे भत्त्याची थकबाकी आणि २०१८ पासूनची महागाई भत्त्याची थकबाकी तातडीने द्यावी आदी मागण्या संघटनेच्या वतीने करण्यात आल्या आहेत. संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना निवेदन दिले आहे.

सुषमा अंधारे यांना मातृशोक

मुंबई : ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सुषमा अंधारे यांच्या मातोश्री शिवकांताबाई गुट्टे



यांचे निधन झाले आहे. स्वत: सुषमा अंधारे यांनी फेसबुकवरून ही माहिती दिली आहे. सुषमा अंधारे यांच्या मातोश्री शिवकांताबाई दत्तराव गुट्टे यांच्या पार्थिवावर मूळगावी नंदनज येथे अंत्यसंस्कार होतील, असे सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे. सुषमा अंधारे यांच्या आईच्या निधनाची बातमी कळताच शिवसैनिक आणि आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी बीडच्या दिशेने धाव घेतली. त्यांच्यासाठी आई अत्यंत जवळची होती.

आंदोलन सुरुच राहणार

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

- शेकापच्या साम्या कोरडे ठाम भूमिकेत
- नोटीसला कायदेशीर उत्तर देणार



कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली पोलिसांकडून होत असलेल्या कारवाईबाबत शेकापच्या पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या प्रमुख साम्या कोरडे यांनी निषेध व्यक्त केला आहे.पोलिसांच्या नोटीसला कायदेशीर उत्तर दिले जाणार असल्याचा इशारा देत काहीही झाले तरी आंदोलन सुरुच ठेवणार, अशी ठाम भूमिका साम्या कोरडे यांनी घेतली आहे.

मुंबईमधील आयआयटीचा विद्यार्थी साहिल वाकोडे याला मृत्यू पश्चात न्याय मिळावे. यासाठी मुंबईत मेणबत्ती मोर्चा काढण्यात आला. नीटप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्यासाठी लढा पुकारला. मुंबईत झालेल्या आंदोलनात शेकापच्या पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या प्रमुख साम्या कोरडे यांनी नेतृत्व केले.न्याय हक्कासाठी त्या लढल्या. मात्र सरकारने पोलीस बळाचा वापर करीत त्यांच्यावर कारवाई सुरु केली आहे. मुंबई माटुंगा येथील परिमंडळ दोनचे उपआयुक्त तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी अनुराग जैन यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली साम्या कोरडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. दखलपात्र गुन्हा व गैरकृत्य होण्याचा ठपका ठेवत त्यांच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३ अन्वये खटला का चालवू नये, अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात •➤पान २ वर

माथेरानमध्ये मालवाहतूक होणार स्वस्त

| माथेरान | प्रतिनिधी |

ई-टेम्पोला परवानगी देण्याच्या हालचाली सुरू

माथेरानमध्ये वाहनांना बंदी आहे, त्यामुळे मालवाहतूक ही घोड्यावरून करावी लागते. त्यामुळे माथेरान नगरपरिषदेकडून ई-टेम्पो मिळावा, अशी मागणी केली जात असताना राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडून हस्तक्षेप केला गेला आहे. लवकरच माथेरानमध्ये मालवाहतूक ने-आण करण्यासाठी ई-रिक्षा वापरली जाऊ शकते असे चित्र निर्माण झाले आहे. दरम्यान, माथेरानमध्ये वाहने नसल्याने सर्वाधिक खर्च हा मालवाहतुकीवर सुरू आहे. त्यामुळे मालवाहतूक करण्यासाठी ई-टेम्पो उपलब्ध झाल्यास कदाचित मालवाहतूक स्वस्त होऊ शकते.

घोड्यांच्या विष्ठेमुळे प्रदूषणाचा



प्रश्न ऐरणीवर माथेरानचे पर्यावरण जपण्यासाठी आणि प्रक्षण कमी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे आणि केतन रामाणे यांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे दाद मागितली होती. प्रवासी घोड्यांची

> हरित लवादाने ९ जून २०२६ रोजी घोड्यांची संख्या टप्प्याटप्प्याने कमी करण्याचे निर्देश दिले आहेत. मालवाह घोड्यांचे ई-टेम्पोद्वारे पुनर्वसन करण्याचा निर्णय नगरपरिषदेने घेतला आहे. पेटाने आठ ई-टेम्पो देण्याची तयारी दर्शवल्याने पालिकेला मदत होणार आहे. - सुनील शिंदे, याचिकाकर्ते

संख्या कमी करण्याची मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे. घोड्यांच्या विष्ठेमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा शास्त्रोक्त अभ्यास करण्याची •➤पान २ वर

दिवाळीसाठी जादा बसेस

रायगडमधून ४० एसटी बस फेऱ्यांचे नियोजन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

दिवाळी सुट्टयांच्या कालावधीत प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाकडून रायगड विभागाकडून यंदाही विशेष जादा फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील एसटी बस आगारांमधून प्रवाशांच्या सोयीसाठी ४० हून अधिक जादा गाड्या सोडल्या जाणार आहेत.

अलिबाग, महाड, माणगाव, श्रीवर्धन, पेण, रोहा, मुरूड या आगारातून लांब पल्ल्याच्या मार्गांसह स्थानिक स्तरावरही वाढीव फेऱ्या चालवल्या जाणार आहेत.गर्दीचा हंगाम विचारात घेऊन अलिबाग-पनवेल विनाथांबा बस सेवेवर अधिक भर दिला जाणार असल्याची एसटी महामंडळ रायगड विभागाकडून देण्यात आली आहे.



यंदा दिवाळीला सुरुवात नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. शुक्रवारी(दि.६) धनत्रयोदशी, रविवारी(दि.८) नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजन, मंगळवारी(दि.१०) बलिप्रतिपदा आणि दिपावली पाडवा तसेच बुधवारी(दि.११) भाऊबीज हे सण असणार आहेत. दिवाळीसाठी लागणारे साहित्यांची दुकाने बाजारात सजली आहेत. नवनवीन कपडे, भांडी व अन्य साहित्य बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे.दिवाळीनिमित्त खरेदीवर अनेक ठिकाणी ऑफरही ठेवण्यात आली आहे. दिवाळी निमित्त शाळांनादेखील सुट्टी असणार आहे. दिवाळीच्या सुट्टीचा आनंद गावी व नातेवाईकांसमवेत घालविण्यासाठी अनेकांनी तयारी केली आहे. दिवाळीची सुट्टी कधी जाहीर होणार याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले आहे. •➤पान २ वर

बळीराजाची भातपीक वाचविण्याची धडपड

जिल्ह्यात भात पीक कापणीला सुरुवात

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पुढील काही दिवस अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. भात कापणीचा हंगाम सुरु झाला आहे. ऐन भात कापणीच्या कालावधीत पाऊस पडल्यास भातपीक भिजण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे दुष्काळाच्या संकटातून काही प्रमाणात वाचलेले पीक पदरात पाडून घेण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू झाली आहे.

यावर्षी रायगड जिल्ह्यामध्ये सुमारे ८४ हजार हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड करण्यात आली. मात्र भात बहरण्याच्या •➤पान २ वर

ताळमेळ साधताना होतेय दमछाक

रायगड जिल्ह्यामध्ये अलिबागसह अनेक भागात भातकापणीच्या कामांना वेग आला आहे. भात कापणीसह झोडणी करून भात घरात जमविण्याची धडपड सुरु झाली आहे. उपलब्ध वेळेत पीक काढून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. दिव कापणीची कामे दिवाळीपूर्वी पूर्ण करण्याच्या प्रयत्नात शेतकरी आहेत. मात्र, मजुरांची उपलब्धता, कापणीसाठी लागणारा वेळ आणि बदलते हवामान यांचा ताळमेळ साधताना शेतकऱ्यांची दमछाक होत आहे.

लाकडी फर्निचरचे वर्कशॉप आगीत भस्मसात

| पोलादपूर | प्रतिनिधी |

पोलादपूर शहरातील सह्याद्रीनगर येथील लाकडी फर्निचरच्या वर्कशॉपला मंगळवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास आग लागून आगीत वर्कशॉपमधील संपूर्ण फर्निचर व मशिनरी जळून खाक झाली. नगरपंचायत पोलादपूरकडे अग्निशमन यंत्रणा नसल्याने आग विझविण्यासाठी विलंब होऊन लाखो रुपयांचे फर्निचर जळून खाक झाले आहे. मात्र अद्याप, आग कशामुळे लागली हे समजून आले नाही.

नगरपंचायत पोलादपूर आणि पोलीस ठाण्याच्या जवळच असलेल्या सह्याद्रीनगर येथे राजेश सुतार यांचे लाकडी फर्निचर वर्कशॉप असून या वर्कशॉपला मध्यरात्रीच्यासुमारास आग लागली.



या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलादपूर नगरपंचायतीचे कर्मचारी रुपेश जाधव यांनी नगरपंचायत पोलादपूरकडे अग्निशमन यंत्रणा नसल्याने महाड नगर परिषदेच्या अग्निशमन दलाचे गोविंद साळुंखे यांना खबर दिली.

महाड नगर परिषदेकडून काही वेळाने अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले. यामुळे आगीवर नियंत्रण मिळवून आग आटोक्यात आणण्यात यश आले. तोपर्यंत वर्कशॉपमधील संपूर्ण फर्निचरसह सुतारकामाची •➤पान २ वर

आदिवासींवर घोर अन्याय

- सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन आक्रमक

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या वीस आदिवासी कुटूंबाना बेघर करण्याचे काम धनदांडग्यांकडून करण्यात आले आहे. अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी येथील आदिवासींवर अन्याय करीत त्यांची घरे जबरदस्तीने तोडून त्यांना विस्थापित करण्यात आले आहे. याविरोधात सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन आक्रमक झाल्या असून संबंधितांवर अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी अशी मागणी पोलीस अधीक्षकांकडे त्यांनी केली आहे.



उल्का महाजन यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी कातकरी आदिवासी वाडीमध्ये पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या २० कुटुंबांना त्यांची घरे जबरदस्तीने •➤पान २ वर

> आदिवासी समाजाकडून आलेल्या तक्रारीनुसार, जबाब घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सोमवारी काही आदिवासी कुटुंबांचे जबाब झाले आहेत. काहींचे बुधवारी जबाब घेतले जातील. - सोमनाथ लांडे, पोलीस निरीक्षक, मांडवा सागरी

प्रशांत नाईक यांनी केली कामाची पाहणी | प्रकल्पाचे ६० टक्के काम पूर्ण

ओशनॅरियम ठरणार अलिबागच्या पर्यटनाचा केंद्रबिंदू

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबागच्या समुद्रकिनाऱ्याचे सौंदर्य आणि मुंबई-पुण्याच्या जवळीकतेमुळे येथे मोठ्या संख्येने पर्यटक येतात; मात्र अनेकांचा अलिबाग दौरा आजही वन-डे ट्रिप पुरताच मर्यादित राहतो. पर्यटकांचा मुक्काम वाढवून अलिबागच्या पर्यटनाला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने समुद्रकिनाऱ्यालगत इनोव्हेटिव्ह कंटेनर थीम्ड ओशनॅरियम अर्थात वैशिष्ट्यपूर्ण सागरी मत्स्यालय उभारण्यात येत आहे. हा प्रकल्प अलिबागच्या पर्यटनाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या प्रयत्नाने हा महत्त्वाकांक्षी ड्रीम



प्रोजेक्ट अंतिम टप्प्यात आहे. या कामाची पाहणी अलिबाग नगरपरिषदेचे वीज व बांधकाम समितीचे सभापती प्रशांत नाईक यांनी केली. पाहणीदरम्यान प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती, प्रगती, बांधकामाचा दर्जा आणि पुढील टप्प्यांचे नियोजन याबाबत संबंधित अधिकारी व कंत्राटदार प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. अलिबाग नगरपरिषद हद्दीतील या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत ६० कोटी रुपयांच्या निधीला २०२४ मध्ये मंजुरी मिळाली आहे. सध्या

> अलिबागकर आणि पर्यटकांसाठी हा वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प लवकरात लवकर लोकार्पण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा प्रकल्प अलिबागच्या पर्यटनाला नवी ओळख देईल. - प्रशांत नाईक, वीज व बांधकाम सभापती, अलिबाग नगरपरिषद

प्रकल्पाचे सुमारे ६० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित काम पूर्ण करून मार्च २०२७ पर्यंत ओशनॅरियम सुरू करण्याचे नियोजन आहे. ओशनॅरियमचा पर्यटकांना समुद्रकिनारा आणि पारंपरिक पर्यटनस्थळांपलीकडे समुद्राशी संबंधित जैवविविधता •➤पान २ वर

आरोग्य विभागात पदोन्नतीचा सावळागोंधळ

समुपदेशन होऊनही आदेश रखडले; १८ अधिकारी प्रतीक्षेत

| रायगड | प्रतिनिधी |

आरोग्य विभागात पदोन्नतीचा अक्षरशः सावळागोंधळ सुरू असून, मंत्रालयातील प्रशासकीय दिरंगाईचा फटका राज्यभरातील अधीक्षकांना बसत आहे. अधीक्षक पदावरून प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाली, पात्र अधिकाऱ्यांची निवडसूची तयार झाली आणि पदस्थापनेसाठी समुपदेशनही पार पडले; मात्र प्रत्यक्ष आदेश काढण्यास मंत्रालयाकडून टाळाटाळ सुरू असल्याचे चित्र आहे.

या कारभारामुळे तब्बल २५ ते ३० वर्षे सेवा बजावलेल्या चार अधीक्षकांना पदोन्नतीचा लाभ न घेताच सेवानिवृत्त व्हावे लागले असून, उर्वरित १८ अधिकारी अद्याप



आदेशांच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे आरोग्य विभागात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

अधीक्षक ते प्रशासकीय अधिकारी पदोन्नतीसाठीची फाईल संचालक, आरोग्यसेवा, मुंबई यांच्याकडून २९ मे रोजी आरोग्य विभागाच्या मंत्रालयातील कार्यालयाकडे पाठविली होती. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने २०२५-२६ च्या निवडसूचीत एकूण २२ अधीक्षकांना प्रशासकीय अधिकारी पदासाठी •➤पान २ वर

आंदोलनांचा इशारा

पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही आदेश रखडत असतील, तर अशा प्रक्रियेचा उपयोग काय, असा सवालही उपस्थित केला जात आहे. विभागीय पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण झालेली असताना पदोन्नतीस पात्र अधीक्षकांचे आदेश प्राधान्याने निर्गमित करावेत, अशी मागणी केली आहे. एपीएमसीमार्फत निवड झालेल्या सरळसेवा उमेदवारांच्या नियुक्तीपूर्वी विभागीय पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करून पात्र अधीक्षकांना न्याय द्यावा, अशी संघटनेची ठाम भूमिका आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

पान १ वरुन

काशिद जेट्टीचा प्रकल्प फेल

ब्रेक वॉटर रस्ता, पार्कींगचे काम डिसेंबपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा होती. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये रोरो जेट्टीसाठी ४२ कोटी रुपयांची निविदा काढण्याची हालचाल सुरु झाली होती. मुंबईहून काशिदला जलवाहतुकीने अवघ्या दोन तासात पोहचता येणार त्यामुळे मुरूडपासून काशिद परिसरातील स्थानिकांनी आणि पर्यटकांना या प्रकल्पाबाबत मोठी आशा निर्माण झाली होती. ही सेवा पर्यटकांसह स्थानिकांसाठी फायदेशीर ठरणार होती. ब्रेक वॉटर बंधाऱ्यासह काही ठिकाणी काँक्रिटीकरण व भरावाचे काम करण्यात आले. सिमेंटचे ठोकळे उभारण्यात आले. मात्र एममबीचा प्रकल्प फेल ठरल्याचे समोर आले आहे. बांधण्यात आलेल्या बंधारा समुद्राच्या उधाणाने निखळला आहे. दगड, सिमेंट ठोकले सरकले आहेत. त्यामुळे एमएमबी विभागाची मोठी पंचायत झाली आहे. काशिद येथील ब्रेक वॉटर बंधारा, पार्किंग, रस्त्याचे काम पूर्णतः अपूर्ण स्थितीत असल्याचे चित्र दिसून आले आहे. ठेकेदारासह महाराष्ट्र सागरी मंडळाच्या दुर्लक्षपणामुळे व अभ्यासाच्या अभावामुळे अपूर्ण कामाचा फटका पर्यटकांसह स्थानिकांना बसत आहे. मुंबई ते काशिद रो-रो सेवा कधी सुरू होणार याची प्रतीक्षा पर्यटकांना लागून राहिली आहे. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिकांचा प्रवासाचा वेळ वाचणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प लवकरात लवकर करण्यात यावा, अशी मागणी प्रवासी वर्गांकडून केली जात आहे. याबाबत महाराष्ट्र सागरी मंडळाच्या अधिकाऱ्यांबरोबर सुपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.

दिवाळीसाठी जादा बसेस

दिवाळीत गावी जाणाऱ्या व नातेवाईकांकडे जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, म्हणून एसटी महामंडळाने ज्यादा गाड्यांचे नियोजन केले आहे. प्रवाशांच्या गर्दीचा विचार करता, यावर्षी दिवाळीनिमित्त जादा एसटी बसेस सोडण्याचा निर्णय एसटी महामंडळ रायगड विभागाने घेतला आहे. जिल्ह्यातील ८ आगारातून लांबपल्ल्यासह लोकल स्तरावर एसटी बसच्या ५० फेऱ्यांचे नियोजन केले आहे. रायगड जिल्ह्यात दिवाळी सण उत्साहात साजरा केला जातो. दिवाळीनिमित्त १२ दिवस सुट्टीदेखील जाहीर झाली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातून बाहेर गावी जाणारे आणि बाहेर गावातून अलिबागसह जिल्ह्यात येणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. सुट्टी असल्याने पर्यटकांचादेखील ओघ वाढण्याची शक्यता आहे. प्रवाशांसह पर्यटकांना चांगली सेवा मिळावी, एसटीच्या उत्पन्नात वाढ व्हावी, म्हणून एसटी महामंडळ रायगड विभागाने दिवाळीसाठी अलिबाग महाड, पेण, श्रीवर्धन, कर्जत, रोहा, मुरूड माणगाव या आगारातून लांब पल्ल्याच्या गाड्या सोडल्या जाणार आहेत. पेण आगारातून जामनेर, श्रीवर्धनमधून अक्कलकोट, रोहा, पाली, खोपोली येथून उमरगा, रोहामधून गोंदावले, मुरूडमधून अक्कलकोट, अलिबागमधून तुळजापूर, माणगावमधून शेगाव, माणगाव व महाडमधून पुणे, खुटीलमधून नालासोपारा, पोलादपूरमधून ठाणे, श्रीवर्धन व बोर्लीमधून बोरीवली एसटी बसेस पाठविल्या जाणार आहेत. महाडमधून पनवेल, अलिबागमधून पनवेल बसेसही सोडल्या जाणार आहेत. एसटीच्या ४०हून अधिक फेऱ्या लांब पल्ल्यासह स्थानिक पातळीवर तालुक्याच्या ठिकाणी पाठविण्यात येणार असल्याची माहिती एसटी महामंडळ रायगड विभागाकडून देण्यात आली आहे. दुसरीकडे, दिवाळीच्या तोंडावर एसटी कर्मचाऱ्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन-भत्ते, थकीत वार्षिक वेतनवाढ आणि २५ हजार रुपये दिवाळी भेट (बोनस) मिळावी या मागण्यांसाठी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. त्यामुळे प्रशासनाकडून प्रवाशांना कोणताही खोळंबा होऊ नये यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

माथेरानमध्ये मालवाहतूक होणार स्वस्त

जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाकडे सोपविण्यात आली होती. या अभ्यासाच्या अहवालानुसार घोड्यांच्या विष्ठेमुळे माथेरानमधील हवा, माती आणि पाणी प्रदूषित होत असल्याचे मत मांडले आहे. या पार्श्वभूमीवर हरित लवादाने माथेरान नगरपरिषद, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि केंद्रीय पर्यावरण विभागाच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली समिती गठित केली होती.माथेरानमधील पर्यावरणाचे संरक्षण आणि मालवाह घोड्यांच्या जागी पर्यायी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने पेटा या प्राणीमित्र संस्थेने पुढाकार घेतला आहे. माथेरान नगरपरिषदेला आठ ई-टेम्पो देण्याची तयारी संस्थेने दर्शवली असून आहे. यासंदर्भातील पत्र २६ ऑक्टोबर रोजी नगरपरिषदेकडे अहवाल सादर करण्यात आले. मालवाहतुकीसाठी ई-टेम्पोचा वापर सुरू झाल्यास घोड्यांची संख्या कमी करण्यास आणि त्यांच्या विष्ठेमुळे होणारे प्रदूषण नियंत्रित करण्यास मदत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.नऊ जून २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत हरित लवादाने घोड्यांच्या विष्ठेवर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया कशी केली जाणार, घोड्यांची संख्या टप्प्याटप्प्याने कशी कमी केली जाणार, घोड्यांचे तबेले कुठे स्थलांतरित केले जाणार आणि त्यांच्या वाहतुकीचे मार्ग कसे निश्चित केले जाणार, याबाबत माहिती सादर करण्यास माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांना सांगितले होते. पेटासंस्थेने यापूर्वी दिल्ली आणि परिसरातील २०८ मालवाहू घोडे व बैलांच्या चालकांना ई-टेम्पो उपलब्ध करून दिल्याची माहिती देण्यात आली आहे. माथेरानमध्येही ई-टेम्पोला हरित लवादाची मान्यता मिळाल्यास मालवाहू घोड्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी पेटा स्वतः घेईल, असे संस्थेचे ज्येष्ठ अधिकारी उज्ज्वल अग्रेन यांनी सांगितले.२९ ऑक्टोबरच्या सुनावणीकडे लक्ष माथेरान नगरपरिषदेने ई-टेम्पो वापरण्यास परवानगी मिळावी, यासाठी हरित लवादाकडे मागणी केली आहे. २९ ऑक्टोबर रोजी होणारी सुनावणी माथेरानच्या पर्यावरणीय भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

लाकडी फर्निचरचे वर्कशॉप आगीत भस्मसात

मशिनरी व अवजारे जळून खाक झाली. ही आग कशामुळे लागली याबाबत निश्चित कारण समजू शकले नाही.वर्कशॉपमध्ये घरगुती वापरासाठी संसारोपयोगी फर्निचर राजेश सुतार यांच्याकडून तयार केले जात असे. यामध्ये सोफासेट, दरवाजे, बेड अन्य इतर फर्निचर संपूर्ण जळून खाक झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. राजेश सुतार यांचे उदरनिर्वाहाचे साधन बेचिराख झाले असून स्वयंरोजगारासाठी पुन्हा सज्ज होणे त्यांना कठीण होणार आहे.

आरोग्य विभागात पदोन्नतीचा सावळागोंधळ

पात्र ठरविले. नियमानुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १८ ऑगस्ट रोजी पदस्थापनेसाठी समुपदेशनही घेण्यात आले, मात्र पदोन्नतीसाठी आवश्यक असलेले टप्पे पार पडले असतानाही प्रत्यक्ष आदेश मात्र अद्याप निर्गमित झालेले नाहीत. विशेष म्हणजे, समुपदेशन होऊन दोन महिन्यांहून अधिक काळ लोटला असतानाही आदेशांना मुहूर्त मिळत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.शासकीय आरोग्यसेवेत आयुष्याची महत्त्वाची वर्षे खर्ची घालणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवाकाळाच्या अखेरच्या टप्प्यात पदोन्नती मिळणे अपेक्षित होते, मात्र प्रशासकीय विलंबामुळे चार अधीक्षकांना पदोन्नतीचा लाभ मिळण्यापूर्वीच नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त व्हावे लागले. प्रदीर्घ सेवा, अनुभव आणि पात्रता असूनही केवळ आदेश वेळेत निघाले नाहीत, तर कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काच्या पदोन्नतीपासून वंचित राहावे लागते, ही बाब संतापजनक असल्याची भावना विभागातील अधिकारी व्यक्त करीत आहेत.

आदिवासींवर घोर अन्याय

तोडून २४ मार्च २०२४ रोजी व त्यानंतरच्या आठवड्यात रहात्या जागेतून विस्थापित करण्यात आले.मार्च २०२४ मध्ये दशरथ पाटील यांनी काही लोकांसह येऊन आदिवासींना धमकावून कोणतीही पूर्वसूचना न देता जेसीबीने बेकायदेशीररीत्या घरे तोडण्यात आली. घरातील सामान उध्वस्त करून मातीच्या ढिगाऱ्याखाली ते जेसीबीने गाडून टाकण्यात आले. बोअरवेल उखडून ती पण गाडून टाकण्यात आली.हे काम करण्याआधी वाडीपासून दोन तीन किमी अंतरावर बांधलेल्या घरात जाऊन राहण्याची जबरदस्ती करण्यात आली.हाताला मिळेल ते सामान घेऊन ही कुटुंबे कशी तरी त्या पर्यायी घरात नाईलाजाने रहायला गेली.काही कुटुंबांना थोडेफार पैसे देण्यात आले तर काहींना अजिबात काही न देता हटवण्यात आले .शासनाने ४ जानेवारी २०१७ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार ही सर्व कुटुंबे त्यांच्या घराखालील जमिनीचे मालक झाले आहेत. तशी नोंद अलिबाग तहसील कार्यालयाच्या सर्वेक्षण रेकॉर्डमध्ये आहे.यांच्याकडे घरपट्टीच्या पावत्या गेल्या पंधरा वीस वर्षांपासून आहेत.घरकूल योजनेतून मिळालेले घर उध्वस्त करून त्यांचे घरातील सामान ढिगाऱ्याखाली दडपले गेले.राहत्या जागेतून हुसकावणे, घरे उध्वस्त करणे हा अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा आहे. हा गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी आदिवासी कुटुंबांनी सातत्याने अनेक वेळा तक्रार केली आहे.यापूर्वी पोलीस उप अधीक्षक व पोलिस निरीक्षक यांना भेटून तक्रार केली आहे. २०२५ मधे एका संस्थेमार्फत राज्य मानवी हक्क आयोगाकडे दावा दाखल करण्यात आला होता. परंतु तुम्हाला पैसे मिळाले आहेत असे सांगून त्यांच्या कडून आमची काही तक्रार नाही असे पोलिसांनी व महसूल विभागाच्या मंडळ अधिकारी यांनी त्यांना जबाब वाचून न दाखवता धमकावून लिहून घेतले आहे. कागदावर काय लिहिले आहे हे वाचून न दाखवता निरक्षर आदिवासींकडून अंगठे घेण्यात आले. सर्वहारा जन आंदोलनाच्या प्रमुख उल्का महाजन यांच्या ही बाब लक्षात आल्यावर त्यांनी पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाईची मागणी केली आहे.

बळीराजाची भातपीक वाचविण्याची धडपड

तयारी असताना पावसाने दडी मारली. पाऊस गायब झाला. त्यामुळे पिकाला मोठा फटका बसला. पाण्याअभावी अनेक ठिकाणी भाताचे दाणे अपेक्षेप्रमाणे भरले नाहीत. परिणामी, भाताच्या उत्पादनात साधारणे ५० टक्केहन अधिक घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून, शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.पावसाच्या कमतरतेमुळे जिल्ह्यातील विविध भागांमध्ये भातशेतीवर मोठा परिणाम झाला आहे. काही ठिकाणी पिकाची वाढ खुंटली, तर काही भागांत दाणे पूर्णपणे भरले नाहीत. अपेक्षित उत्पादन मिळण्याची आशा आता कमी झाली आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामात उत्पादनाचा खर्चही भरून निघेल की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना निर्माण झाली आहे. यंदाच्या हंगामात पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना सुरुवातीपासूनच अडचणींचा सामना करावा लागला. पिकाला आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने पाठ फिरवल्याने भातशेतीचे नुकसान झाले. त्यामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून भात कापणीला सुरुवात झाली आहे. मात्र काही दिवसांमध्ये अवकाळी पाऊस कोसळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी चिंतेत पडले आहेत. दुष्काळामुळे आधीच उत्पादन घटण्याची भीती व्यक्त झाली आहे. त्यात वाचलेले पीक पदरी पाडण्यासाठी शेतकऱ्यांनी धडपड सुरु केले आहे. अवकाळी पावसाचा इशारा मिळाल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे राहिले आहे. शेतात उभे असलेले पीक वेळेत कापणे, कापलेले भात सुरक्षित ठिकाणी ठेवणे आणि पावसापासून त्याचे संरक्षण करणे, अशी अनेक आव्हाने शेतकऱ्यांसमोर आहेत.

ओशनॅरियम ठरणार अलिबागच्या पर्यटनाचा केंद्रबिंदू

आणि सागरी जीवनाचा आधुनिक अनुभव एकाच ठिकाणी घेता येणार आहे. त्यामुळे कुटुंबे, विद्यार्थी, पर्यटक तसेच शैक्षणिक सहलींसाठी हे केंद्र आकर्षणाचे ठिकाण ठरण्याची शक्यता आहे. महत्त्वाचे म्हणजे, अशा आकर्षणामुळे पर्यटकांचा अलिबागमधील मुक्काम वाढल्यास त्याचा थेट फायदा हॉटेल, होमस्टे, रेस्टॉरंट, स्थानिक वाहतूक, पर्यटन मार्गदर्शक आणि स्थानिक छोट्या व्यावसायिकांना होऊ शकतो. त्यामुळे ओशनॅरियम केवळ एक बांधकाम प्रकल्प म्हणून नव्हे, तर अलिबागच्या पर्यटन अर्थव्यवस्थेला चालना देणारा डेस्टिनेशन अँकर म्हणून पाहिले जात आहे. राज्यातील पर्यटनस्थळांमध्ये अलिबागची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी आधुनिक आणि अनुभवाधारित पर्यटन सुविधांची गरज आहे. त्या दृष्टीने ओशनॅरियम हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अलिबागच्या पर्यटनाच्या वन-डे फॉर्म्युलाला मोठा पर्याय निर्माण करणारा आणि राज्याच्या पर्यटन क्षेत्रात वेगळा प्रयोग ठरण्याची अपेक्षा आहे. पाहणीवेळी नगरसेवक प्रदीप नाईक, नगरअभियंता संतोष मुंढे, स्थापत्य अभियंता ऋतुजा फुटाणे, रचना सहाय्यक सौरभ खरात तसेच कंत्राटदार कंपनी प्रोलिफिक टेक्नोसिस प्रतिनिधी भाविन पारेख आणि अभिजीत उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

आदिवासी बांधवाचा संशयास्पद मृत्यू

आहे. मात्र प्रशासनाने हे आरोप फेटाळले आहेत. दरम्यान कांबडी यांचा मृतदेह शव विच्छेदनासाठी पुढे पाठवण्यात आला आहे तर नातेवाईकांनी दोषींवर गुन्हा दाखल करण्यासाठी थेट खारघर पोलीस ठाणे गाठले आणि बाळाराम कांबडी यांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांवर अ‍ॅट्रॉसिटी आणि हत्येचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर कांबडी यांचा मृत्यू कशामुळे झाला हे समजणार आहे.

मेहेर यार्ड कंपनीविरोधात गेट बंद आंदोलन

कामगारांना प्राधान्य देऊन त्यांना लोकल लेबर, सर्व्हेअर आणि हाऊसकीपिंगसारख्या विविध कामांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, ही आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. स्थानिक तरुणांना रोजगारासाठी संधी मिळाल्यास परिसरातील बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल, अशी भूमिका आंदोलकांकडून मांडण्यात येत आहे.

आंदोलन सुरुच राहणार

आली आहे. शुक्रवारी ३० ऑक्टोबरला दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास हजर राहण्यास सांगितले आहे. पोलिसांच्या या प्रकारामुळे पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या साम्या कोरडे यांनी निषेध व्यक्त केला आहे. घटनेने आंदोलनाचे हक्क दिले आहेत. अन्यायाविरोधात लढण्यासाठी आंदोलन करणे गरजेचे आहे. त्यामुळे जो लढा दिला आहे. कायदेशीर मार्गाने होता. चुकीचे काहीच केले नाही. संविधानाने आंदोलनाचा अधिकार दिला आहे. त्यामुळे न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरुच राहणार आहे.

-: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती या खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे हरनेरी, ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत

मालकाचे नाव	सर्वे क्र.	एकूण क्षेत्र हे.आर.	आकार रू.पै.	भोगवटा वर्ग
कृष्णा गोविंद मालुसरे	८/१/ब	०.३७.०० पैकी ०.१८.०० हे. आर.	०.०९	१

वरील मिळकतीसंबधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार अखत्यार लिएन चार्ज, अ‍ॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा कुळवहिवाट, ताबा, कबजा, वहीवाट वचनचिठ्ठी दावा दरखास्त, जप्ती, मॉटेगेज, संपादन, रिझव्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसाचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गुहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे,

दिनांक: २१/०८/२०२६

अ‍ॅड. रुचिता संतोष भगत,
अ‍ॅडव्होकेट
मु. पोष्ट जांभूळपाडा
ता. सुधागड, जि.रायगड
मोबा नं. : ९८६०२४७७३९

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जि.रायगड
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड, अलिबाग.जि.रायगड
Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch

'' जाहिरात''

विषय:- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग- रायगड येथील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक तात्पुरत्या नियुक्तीने (कंत्राटी) पदभरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.....

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग - रायगड येथील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक ''गट-अ'' या पदावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी) नियुक्ती जाहिरात देणेत येत आहे. सदर जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर (www.gmchalibag.in/gmch) तसेच मा. संचालनालयाच्या (www.med- edu.in) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. रिक्त पदे, अर्जाचा विहित नमुना व अटी शर्ती इ. अधिक तपशील पाहण्याकरिता वरील दिलेल्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी.

१) उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी	दि. २८/१०/२०२६ ते दि. ०३/११/२०२६ सकाळी ११.०० ते सायं.०५.०० वाजेपर्यंत. (सुटीचे दिवस वगळुन)
२) मुलाखतीचा दिनांक	दि.०४/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता
३) मुलाखतीचे ठिकाण	अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड (परिषद हॉल)

सही/-
(डॉ. पूर्वा पाटील)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
अलिबाग - रायगड.

विमाका/कोवि/२०२६-२०२७/१४७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत, त्या मिळकतीचे मालक मे डी एस कॉर्पोरेशन तर्फे भागीदार जयंतीलाल देवशी पटेल व हर्षद रमेश पटेल यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर /प्लॉट नंबर	क्षेत्रफळ आर.चौ.मी	आकार रु. पै.
१६४/६	२-९४-००	५-८८

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिलांकडून वरील मिळकतीबाबत विकसनाचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २८/१०/२०२६

अ‍ॅड. समीर आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३



दिनांक : २८ ऑक्टोबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे चोरावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत

मालकाचे नांव	सर्व्हे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र आर.चौ.मी	आकार रु.-पै.
प्रविण प्रभाकर	२७	३५९	३३३.००	३३-३०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
अ‍ॅड. भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २८/१०/२०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन :-

मौजे - अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार	
			हे.आर.पॉ.	रुपये	पैसे
श्री. अरूण परशुराम यादव व इतर	१०५	३/अ	०-८२-००	०	६०

या मिळकतींपैकी लिहून देणार यांचे हे. आर चौमी ०-४०-०० इतके क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
अ‍ॅड. ईश्वरी जयेश म्हसे
दिनांक :- २८/१०/२०२६
मो. नं. ८४४६७३६७९८
ई मेल:- Ishwarimhase@gmail.com

जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येते की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी मौजे पेझारी येथील, खालील वर्णनाच्या मिळकती यशोदा जगदीश पाटील, चंद्रकांत आल्या पाटील, ताईबाई आल्या पाटील, कल्पना तुकाराम म्हात्रे उर्फ भगत व विठाबाई उर्फ सुनंदा बळीराम म्हात्रे यांचे नावे ७/१२ कडे असणाऱ्या जमिन मिळकती आहेत.

अनु.	गट/सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.-पै.)
१	५८	१क	०-३४-००	५-०६
२	६१	२	०-३०-६०	४-६९

आमचे अशिलांनी सदर जमिन मिळकती खरेदी करण्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी चालू केली असून, सदर खरेदी व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी वर नमूद गट/सर्व्हे नंबर ५८/१क आणि ६१/२ या मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, मौजे पेझारी येथील गट/सर्व्हे नंबर ५८/१क आणि ६१/२ या मिळकतींमध्ये वर नमूद मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण साठेकरार, वहिवाट अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशिलांनी ठरविलेल्या व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-

तारीख : २७/१०/२०२६

अ‍ॅड. राजेंद्र मधुसूदन कुंटे
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग- रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	एकुण क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
आक्षी ता.अलिबाग	२३५/१/१	जिरायत ०.१४.४० बागायत ०-२३-४० पो.ख. ०-१३-६० ०-५१-४०	९.९९

वर वर्णन केलेल्या बागायत जमिन मिळकतीपैकी ०-०८-९० हे. आर. क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री नथुराम भाऊ वाळंज यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक - २७/१०/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

अ‍ॅड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
ऑफिस-लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राममंदिर समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

निवडक

मेट्रो स्थानकाजवळ मद्यपींचा वावर

पनवेल : तळोजा येथील पेठाली मेट्रो स्थानकाच्या वाहनतळ परिसरात रात्रीच्या वेळी मद्यपींचा वावर वाढल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मद्यप्राशन केल्यानंतर दारूच्या बाटल्या फोडून निघून जाण्याचे प्रकार घडत असल्याने परिसरात काचेचे तुकडे पसरले आहेत. यामुळे वाहनचालकांना दुखापत होण्याची शक्यता



असून, वाहनतळाच्या सुरक्षेसाठी तातडीने सुरक्षारक्षक नेमावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.नवी मुंबई मेट्रो मार्गावरील बहुतांश स्थानकांवर सिडकोच्या माध्यमातून वाहनतळाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामध्ये पेठाली मेट्रो स्थानकाचाही समावेश आहे. या वाहनतळावर दररोज दुचाकी आणि चारचाकी वाहने उभी केली जातात. मात्र, परिसरात सुरक्षारक्षक नसल्याने रात्रीच्या वेळी देखरेखीचा अभाव जाणवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्थानक परिसरातील शांतता आणि अंधाराचा फायदा घेत काही तरुण येथे मद्यप्राशन करतात. त्यानंतर दारूच्या बाटल्या फोडून किंवा वाहनतळाच्या भिंतीलगत टाकून तेथून निघून जातात. त्यामुळे वाहनतळ परिसरात काचेचे तुकडे पसरत असून, वाहनांच्या टायरचे नुकसान होण्याबरोबरच नागरिकांना दुखापत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या प्रकारांमुळे परिसराच्या स्वच्छतेचाही प्रश्न गंभीर बनला आहे. वाहनतळाचा वापर करणाऱ्या प्रवाशांना सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. रात्रीच्या वेळी नियमित गस्त, पुरेशी प्रकाशव्यवस्था आणि सुरक्षारक्षकांची नियुक्ती करून मद्यपींच्या वावराला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

'शासनाने संपूर्ण जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा'

माणगाव : केवळ श्रीवर्धन नव्हे तर रायगड जिल्ह्यातील उर्वरित १४ तालुक्यांतील शेतकरी हवालदिल झाले आहेत. शासनाने याकडे लक्ष देऊन संपूर्ण जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातर्फे पक्षाचे जिल्हा अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे उपाध्यक्ष सज्जाद डावरे, संताजी पवार, राजू रोडेकर यांनी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी गांभीर्याने लक्ष केंद्रित न केल्यास रा.काँ. शरद पवार पक्षातर्फे बुधवारी दि.२८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. माणगाव तहसील कार्यालया समोर अन्न त्याग आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगितले. याबाबतचे निवेदन सोमवारी (दि.२६) ऑक्टोबर रोजी पक्षाच्या या कार्यकर्त्यांनी माणगाव तालुक्याचे प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप, तालुक्याचे तहसीलदार विपीन लोकरे, माणगाव पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांनी दिले. त्यामुळे जिल्हा तातडीने दुष्काळग्रस्त घोषित करावा. अशा विविध मागण्या शासनाकडे केल्या आहेत. शासनाने या मागण्यांकडे केवळ निवेदन म्हणून न पाहता तातडीच्या निर्णयाचा विषय म्हणून पाहावे. मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, याची शासनाने नोंद घ्यावी. असा इशारा पक्षाचे डावरे यांनी दिला आहे.

मानधन न मिळाल्यास मध्यान्ह भोजन बंद!

पेण : शालेय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजन योजनेतील स्वयंपाकी व मदतनीस महिलांचे मानधन आणि इंधन खर्च अनेक महिन्यांपासून थकीत असल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. दिवाळीपूर्वी शासनाने थकीत देयके जमा न केल्यास तालुक्यातील मध्यान्ह भोजन वाटप बंद करण्याचा इशारा स्वयंपाकी व मदतनीस महिलांनी दिला आहे. यासंदर्भात स्वयंपाकी व मदतनीस महिलांच्या शिष्टमंडळाने नुकतेच पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांना निवेदन सादर केले. महिलांनी दिलेल्या माहितीनुसार, जून महिन्यापासून मानधन मिळालेले नाही, तर एप्रिलपासून इंधन खर्चाची रक्कम जमा झालेली नाही. जूनपासून तेलाचा पुरवठा बंद असून ऑगस्ट महिन्यापासून धान्य व इतर आवश्यक साहित्याचाही पुरवठा झालेला नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांना भोजन देताना अडचणी निर्माण होत असून स्वयंपाकी व मदतनीस महिलांची आर्थिक कोंडी झाली आहे. एकीकडे विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्याची जबाबदारी या महिलांवर असताना दुसरीकडे अनेक महिन्यांपासून मानधन आणि खर्चाची रक्कम मिळत नसल्याने त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. दिवाळी हा आनंदाचा सण जवळ आला असतानाही हातात मानधन नसल्याने महिलांवर निराशेचे सावट आहे. शासनाने दिवाळीपूर्वी थकीत मानधन, आवश्यक साहित्याचा पुरवठा तातडीने करावा; अन्यथा संपूर्ण पेण तालुक्यात मध्यान्ह भोजन वाटप बंद करण्यात येईल, असा ठाम इशारा या महिलांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना दिला आहे.

लोखंडी रॉडने मारहाण

नवीन पनवेल : जुन्या वादाच्या रागातून लाथा बुक्क्या आणि लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी चौघा विरोधात खारघर पोलीस ठाण्यात २६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. एकनाथ शिंदे (वय ४०) हे २६ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास खारघर गाव मेट्रो स्टेशन जवळ, सेक्टर १३ येथे त्यांच्या पाहुण्यांच्या घरी आले होते. या ठिकाणी त्यांचा मुलाचा मेव्हणा अक्षय जालिंदर चव्हाण, भाऊ आनंद जालिंदर चव्हाण, अनुसया जालिंदर चव्हाण आणि काजल जालिंदर चव्हाण यांनी जुन्या वादाच्या रागातून त्यांना लाथा बुक्क्यांनी आणि लोखंडी रॉडने मारहाण केली आणि डोक्यात दुखापत केली.

कुंडलिका नदी रसायनांच्या विळख्यात

■ नदी उशाला, तरी रोहेकरांची तहान कायम ■ मैलामिश्रित पाण्यामुळे नागरिक आक्रमक

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा तालुक्याला बारमाही वाहणाऱ्या कुंडलिका नदीचे वरदान लाभले असतानाही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. एका बाजूला पाणीटंचाईमुळे काही गावांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे, तर दुसरीकडे धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक सांडपाणी आणि रोहा शहरासह आसपासच्या गावांतील सांडपाणी नदीत मिसळत असल्याच्या तक्रारींमुळे कुंडलिका नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नदीकाठी राहूनही शुद्ध पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर आल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

रोहा-अष्टमीला जोडणाऱ्या कुंडलिका नदीवरील पुलावरून



पाहिल्यास नदीच्या पाण्याच्या स्थितीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. धाटाव औद्योगिक क्षेत्रातून बाहेर पडणारे रासायनिक सांडपाणी तसेच शहरातील घरगुती सांडपाणी नदीत मिसळत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. या प्रदूषणामुळे नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेवर, जलचरांवर आणि संपूर्ण नैसर्गिक परिसंस्थेवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

तालुक्यात कुंडलिकेसारखी नदी उपलब्ध असतानाही काही गावांमध्ये पाणीपुरवठ्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागत असल्याचे चित्र आहे. एका बाजूला नदीचे पाणी समुद्राकडे वाहून जात असताना दुसरीकडे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे जलस्रोतांचे नियोजन, पाणी साठवणूक आणि सुरक्षित पाणीपुरवठा यंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील सांडपाण्यावर निर्धारित निकषांनुसार प्रक्रिया केली जाते का, प्रक्रिया यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत आहेत का आणि रोहा शहर व आसपासच्या गावांतील सांडपाण्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावली जाते का, याची संबंधित यंत्रणांनी सखोल तपासणी करणे गरजेचे आहे.

नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी ठोस कृती आराखडा कधी तयार होणार? नदीत मिसळणाऱ्या औद्योगिक आणि घरगुती सांडपाण्यावर नियंत्रण कधी आणले जाणार? नदीकाठच्या नागरिकांना सुरक्षित पिण्याचे पाणी कधी उपलब्ध होणार? या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाला द्यावी लागणार आहेत. कुंडलिका नदीचे आरोग्य सुधारून रोहेकरांची तहान भागवण्यासाठी संबंधित यंत्रणा प्रत्यक्ष कृती कधी करणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

नियमित गुणवत्ता तपासणी आवश्यक

नदीचे पाणी पिण्यासाठी वापरण्यायोग्य बनवायचे असल्यास केवळ पाणी उपलब्ध असणे पुरेसे नाही. त्यासाठी प्रदूषणावर नियंत्रण, योग्य जलशुद्धीकरण, नियमित गुणवत्ता तपासणी आणि शास्त्रीय पद्धतीने जलव्यवस्थापन करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, नदीचे अस्तित्व असूनही नागरिकांची पाण्याची समस्या कायम राहण्याची शक्यता आहे.

तळोजा एमआयडीसीत ३६ तासांची पाणीबंदी

| पनवेल | प्रतिनिधी |

तळोजा एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात प्रस्तावित सलग ३६ तासांच्या पाणीपुरवठा बंदीला तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने विरोध दर्शविला आहे. हा निर्णय मागे घेऊन त्याऐवजी दररोज ठरावीक वेळेत टप्प्याटप्प्याने पाणीकपात करावी, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांनी तळोजा एमआयडीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सलग ३६ तास पाणीपुरवठा बंद राहिल्यास पाण्याचा दाब पूर्ववत होण्यासाठी अतिरिक्त वेळ लागेल. परिणामी, उद्योगांचे कामकाज ४८ ते ७२ तास विस्कळीत होण्याची



शक्यता आहे. यामुळे उत्पादनाचे नुकसान, आर्थिक फटका आणि विशेषतः सतत प्रक्रिया सुरू असलेल्या उद्योगांमध्ये सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे निवेदनात नमूद केले आहे.

औद्योगिक क्षेत्रातील पाणीटंचाईची जाणीव असून जलसंवर्धनासाठी उद्योग सहकार्य करण्यास तयार आहेत. मात्र, उद्योगांशी चर्चा न करता थेट ३६ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय व्यावहारिक नसल्याचे संघटनेने म्हटले आहे. पूर्ण बंदीऐवजी दररोज ठरावीक वेळेत टप्प्याटप्प्याने पाणीकपात केल्यास उद्योगांवरील परिणाम कमी करता येतील, असा पर्याय टीआयएने सुचविला आहे.

पाणीपुरवठ्याशी संबंधित समस्यांवर तोडगा काढण्यासाठी एमआयडीसी अधिकाऱ्यांसोबत तातडीने संयुक्त बैठक घ्यावी, तसेच पाणीगळतीची तांत्रिक तपासणी करून पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.

आता एमआयडीसी प्रशासन या मागण्यांवर काय निर्णय घेते आणि प्रस्तावित पाणीबंदीबाबत कोणता पर्याय स्वीकारते, याकडे तळोजा औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांचे लक्ष लागले आहे.

'अमृत पेठ' दिवाळी शॉपिंगचे आयोजन

| रेवदंडा | प्रतिनिधी |

दिवाळीच्या सणानिमित्त रेवदंडा परिसरातील नागरिकांना खरेदीचा अनोखा अनुभव मिळावा, तसेच स्थानिक उद्योजक आणि व्यावसायिकांना व्यवसायाची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने 'अमृत पेठ-थेट बाजारपेठ' या भव्य दिवाळी शॉपिंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रेवदंड्यात प्रथमच आयोजित करण्यात येणारा हा महोत्सव ३० व ३१ ऑक्टोबर तसेच १ नोव्हेंबर २०२६ या तीन दिवसांत हरेश्वर, कालभैरव मैदान, रेवदंडा बंदर, अलिबाग, रायगड येथे पार पडणार आहे. स्थानिक उद्योजक, व्यावसायिक आणि विक्रेत्यांना आपल्या उत्पादनांचे व वस्तूंचे प्रदर्शन करून विक्री करण्यासाठी हा महोत्सव महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. हा महोत्सव दररोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या महोत्सवात दिवाळीनिमित्त विविध आकर्षक वस्तूंची खरेदी करण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. दर्जेदार वस्तू थेट बाजारपेठेतून खरेदी करता याव्यात, तसेच कुटुंबीयांसह सणासुदीच्या खरेदीचा आनंद लुटता यावा, या दृष्टीने महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे.

पैशांचा पाऊस पाडण्याच्या आमिषाने फसवणूक

| पनवेल | प्रतिनिधी |

पैशांचा पाऊस पाडण्यासह दम्याचा आजार बरा करण्याचे आमिष दाखवून नाशिक येथील भोंदूबाबाने पनवेलच्या दाम्पत्याची सुमारे साडेसात लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी गंगापूर पोलिसांनी अरुण धोंडू पाटील याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून, त्याचा शोध सुरू आहे. पनवेलमध्ये राहणारी तक्रारदार महिला दम्याच्या आजाराने त्रस्त होती. २०२२ मध्ये तिच्या पतीला नाशिकच्या गंगापूर रोड परिसरातील पाटील हा अघोरी पूजेच्या माध्यमातून



- पूजेसाठी ५० हजार रुपयांची मागणी
- पनवेलच्या दाम्पत्यांची फसवणूक

आजार बरा करतो, अशी माहिती मिळाली. त्यानंतर दाम्पत्याने त्याची भेट घेतली. पूजेसाठी ५० हजार रुपयांची मागणी केली आणि त्यापैकी २५ हजार रुपये आगाऊ घेतले. यानंतर महिलेची प्रकृती पुन्हा बिघडल्याने दाम्पत्याने पाटील याच्याशी संपर्क साधला. त्याने पुढील पूजेसाठी दोन लाख रुपयांची मागणी केली. पुन्हा दाम्पत्याला गोदावरी नदीकिनारी नेऊन पूजा करण्यात आली. मात्र, पैशांचा पाऊस पडला नाही आणि आजारही बरा झाला नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे दाम्पत्याच्या लक्षात आले. या प्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर गंगापूर पोलिसांनी पाटील याच्याविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी मधमाशीपालन प्रशिक्षण

| अलिबाग | प्रतिनिधी |

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ), थळ युनिट आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागांतर्गत तालुका कृषी अधिकारी, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी मधमाशीपालन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन आरसीएफ थळ येथील शेतकरी प्रशिक्षण केंद्रात करण्यात आले.



आरसीएफच्या कॉर्पोरेट सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना मधमाशीपालनासाठी प्रोत्साहन देणे, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध करून देणे आणि शेतीपूरक व्यवसायाच्या माध्यमातून त्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. आरसीएफ थळतर्फे शेतकऱ्यांना १०० मधमाशीपालन पेट्यांचे वितरण करण्यात येणार आहे. प्रशांत गावडे संतोष करंजे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तर अलिबागचे तालुका कृषी अधिकारी तन्मय भगत आणि हिंदराव मोरे यांनी सहभाग घेतला. त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे, शेतीपूरक व्यवसायांच्या संधींचा लाभ घेण्याचे आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करून आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास आरसीएफ थळचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी डॉ. राकेश कवळे, योगेंद्र भोईर, जनसंपर्क अधिकारी सुरेश चौधरी उपस्थित होते.

पेण तालुक्यात सहा शाळांना टाळे!

■ शिक्षणाधिकारी, लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

| पेण | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील २१ शाळा बंद झाल्याची माहिती समोर येत असून, त्यामध्ये पेण तालुक्यातील सर्वाधिक सहा शाळांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. एकेकाळी विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेण तालुक्यातील शाळांवर अशी वेळ येणे ही केवळ शिक्षण क्षेत्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी चिंतेची बाब ठरत आहे. ज्या भूमीने विद्वत्ता, संस्कार आणि शिक्षणाची परंपरा जपली, त्याच भूमीत शाळांचे दरवाजे बंद होत असतील, तर या परिस्थितीला जबाबदार कोण, असा



प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

पेण तालुक्याची ऐतिहासिक ओळख, सांस्कृतिक परंपरा आणि शैक्षणिक वारसा मोठा आहे. मात्र, बदलत्या काळात शिक्षण क्षेत्रात अनेक आव्हाने निर्माण होत असताना ग्रामीण भागातील शाळा बंद होणे ही गंभीर बाब आहे. शाळा म्हणजे केवळ चार भिंतींची इमारत नसते, तर ती गावाच्या सामाजिक आणि बौद्धिक विकासाचा पाया असते. त्यामुळे एखादी शाळा बंद होणे म्हणजे त्या गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या संधींवर परिणाम होण्याची शक्यता असते.

जिल्ह्यात बंद झालेल्या २१ शाळांमध्ये पेण तालुक्यातील सहा शाळांचा समावेश आहे. यामध्ये बहिरमकोटक, खरोशी कोयना, शिर्कीचा नंबर एक, बंगालवाडी, नानेगाव आणि नाडे येथील शाळांचा उल्लेख केला जात आहे. या शाळा बंद होण्यामागील नेमकी कारणे काय आहेत, विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली होती का, शिक्षकांची पदे रिक्त होती का किंवा प्रशासकीय निर्णयामुळे या शाळा बंद झाल्या, याची सविस्तर माहिती समोर येणे आवश्यक आहे.

शाळा बंद होण्यामागे विद्यार्थ्यांची घटती संख्या, स्थलांतर, शैक्षणिक सुविधांचा अभाव, शिक्षकांची कमतरता किंवा अन्य प्रशासकीय कारणे असू शकतात. मात्र, कोणत्या शाळेबाबत नेमके कोणते कारण लागू होते, हे अधिकृत माहिती आणि संबंधित विभागाच्या अहवालातून स्पष्ट होणे गरजेचे आहे. शाळा बंद होण्याच्या प्रश्नावर शिक्षक, शिक्षण विभागातील अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या भूमिकेवर चर्चा सुरू आहे. मात्र, कोणालाही थेट दोषी ठरविण्यापूर्वी वस्तुस्थितीची पडताळणी होणे आवश्यक आहे. तालुक्यात सहा शाळा बंद झाल्याची माहिती समोर येत असेल, तर या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. पेणच्या शैक्षणिक अधोगतीला नेमके कोणते घटक कारणीभूत आहेत आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी जबाबदारी स्वीकारणार कोण? असे बोलले जात आहे.

तिसऱ्या मुंबईच्या दिशेने वाटचाल

पेण परिसराकडे भविष्यातील औद्योगिक आणि नागरी विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे क्षेत्र म्हणून पाहिले जात आहे. विकासाच्या मोठमोठ्या संकल्पना मांडल्या जात असताना शिक्षणासारख्या मूलभूत क्षेत्रात शाळा बंद होण्याची परिस्थिती निर्माण होणे ही विसंगतीच म्हणावी लागेल.

माजी आ. बाळाराम पाटील यांचे आवाहन | **सोहळ्यांतून सामाजिक संदेश देणे आवश्यक**

लग्नातील अनावश्यक खर्चाला आळा बसावा

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेल आगरी समाजातील विवाह सोहळे अधिक शिस्तबद्ध, साधेपणाने आणि समाजहिताचा विचार करून पार पडावेत, तसेच लग्नातील अनावश्यक खर्चाला आळा बसावा, यासाठी पनवेल तालुक्यातील गावोगावी जाऊन जनजागृती करण्यात येणार आहे. आगरी समाजाच्या विवाह पद्धतीतून इतर समाजांसमोर एक वेगळा आणि सकारात्मक संदेश जावा, असे आवाहन माजी आ. बाळाराम पाटील यांनी केले.

पनवेल येथील आगरी समाज हॉलमध्ये आयोजित समाजहितविषयक बैठकीत विवाह सोहळ्यांचे नियोजन, सामाजिक



परंपरा, समाजातील एकोपा आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाबाबत चर्चा करण्यात आली. विवाह सोहळ्यांमध्ये वाढणारा अनावश्यक खर्च कमी करणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील ताण दूर करणे आणि समाजातील सर्व घटकांना परवडणारी विवाह पद्धती विकसित करणे, या विषयांना बैठकीत महत्त्व देण्यात आले.

लग्न हा प्रत्येक कुटुंबासाठी आनंदाचा आणि भावनिक क्षण असतो. आई-वडील आपल्या मुला-मुलींच्या विवाहाबाबत अनेक स्वप्ने पाहतात. त्यामुळे विवाह पद्धतीत बदल करताना त्यांच्या भावना आणि कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीचाही विचार होणे आवश्यक आहे. समाजातील काही कुटुंबांना मोठा विवाह सोहळा आयोजित करणे शक्य असते, तर काही कुटुंबांना आर्थिक अडचणींमुळे साध्या पद्धतीने लग्न करणे अधिक सोयीचे ठरते.

विवाहातील अनावश्यक खर्च टाळणे, सामूहिक विवाहांना प्रोत्साहन देणे, सामाजिक परंपरा जपत सर्वांना परवडेल अशी विवाह पद्धती विकसित करणे, यासाठी जनजागृती करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. मात्र, नियमावली तयार करताना समाजातील ग्रामस्थ, महिला, तरुण, पालक आणि संबंधित कुटुंबांच्या मतांचाही विचार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

गावोगावी संवादातून जनजागृती

पनवेल तालुक्यातील विविध गावांमध्ये जाऊन समाजबांधवांशी संवाद साधण्यावर भर देण्यात येणार आहे. विवाह सोहळ्यांतील अनावश्यक खर्च कमी करण्याचे महत्त्व, सामाजिक एकजूट आणि पुढील पिढीच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बदलांबाबत जनजागृती केली जाणार आहे. या उपक्रमातून आगरी समाजाच्या विवाह पद्धतीला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न राहणार आहे.

पाणीटंचाईच्या संकटावर प्रशासन ढिम्म

| उरण | प्रतिनिधी |

पाण्याचे संकट डोक्यावर घोंगावत असताना उरणमधील स्थानिक प्रशासनाला जाग कधी येणार? पाणीटंचाईने जनतेच्या घशाला कोरड पडल्यावरच प्रशासन धावपळ करणार आहे का? उरण शहरासह तालुक्यातील गाव-वाड्यांमध्ये संभाव्य पाणीटंचाईचा धोका वाढत असताना विहिरी आणि तलाव स्वच्छ करून तेथील पाणी वापरात आणण्यासाठी ठोस हालचाली होताना दिसत नाहीत. पावसाने पाठ फिरवली की पाण्याची चिंता वाढते, हे माहीत असूनही प्रशासनाने वेळीच खबरदारी घेतली नाही, तर उरणकरांवर पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ येण्याची दाट शक्यता आहे. पावसाळ्यात पाण्याने तुडुंब भरलेले जलस्रोत काही महिन्यांतच दुर्लक्षित होतात आणि पाणीटंचाईची चाहूल लागताच प्रशासनाची धावपळ सुरू होते. हा प्रकार थांबणार कधी? उरण तालुक्यातील ग्रामीण भागासह शहरातील विहिरी आणि तलावांची स्वच्छता करून त्यांचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे. मात्र, या मूलभूत उपाययोजनांसाठी स्थानिक प्रशासनाने तत्परता दाखविणे आवश्यक असताना उदासीनतेचे चित्र दिसत असल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडत आहे. उरणमधील गाव-वाड्यांत प्रत्यक्ष किती पाणीपुरवठा होतो, याची प्रशासनाने तातडीने तपासणी करण्याची मागणी होत आहे.

फ्यूज उडालेले शहर

तिसऱ्या मुंबईची पायाभरणी करीत असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी परवा केली आणि लगेचच दुसऱ्या दिवशी मध्य रेल्वेच्या वाहतुकीचा बोजवारा उडाला. प्रवाशांचे तर प्रचंड हाल झालेच. पण तिघांचा बळीही गेला. या दोन घटना एकापाठोपाठ घडाव्यात हा योगायोग असला तरी बराच सूचक आहे. मुंबईतील सर्व व्यवस्था अगदी कड्याच्या टोकावर येऊन थांबलेल्या आहेत. एक धक्का दिला की हे शहर आणि इथले लोक दरीत कोसळू शकतात. किंवा एक फ्यूज उडाला की सगळे शहर ठप्प होऊ शकते. सोमवारी आधी ठाणे ते मुलुंड दरम्यान ओव्हरहेड वायरमध्ये बिघाड झाला. नंतर कांजूरमार्गच्या सिग्नल केबिनला आग लागली आणि सिग्नलच्या सगळ्या वायर जळल्या. परिणामी रेल्वेचे सिग्नल बंद पडले. नशीब असे की एकाएकी सिग्नल बंद पडून गाड्यांवर गाड्या धडकण्यासारखी वगैरे काही दुर्घटना घडली नाही. या केबिनचे दार बंद होते आणि आतून धूर येऊ लागला तरीही ते उघडणे शक्य झाले नाही. त्याच्या कुलुपाची चावी म्हणे एका कर्मचाऱ्याकडे होती व तो बाहेर गेला होता. त्यामुळे हे दार तोडायला आणि आग विझवायला उशीर झाला अशा बातम्या आहेत. मुंबईची सगळी यंत्रणा कशी नाजूक पायावर उभी आहे हे यातून कळावे. एका बेफिकिरीमुळे लाखो माणसांचा जीवनक्रम अस्ताव्यस्त होऊ शकतो. आणि काहींचा जीवही जाऊ शकतो. या आगीमुळे पुढचे किमान बारा तास रेल्वेची वाहतूक विस्कळीत होती. स्वयंचलित सिग्नल बंद पडल्याने मॅन्युअल रीतीने काम करावे लागले. त्यामुळे गाड्यांना विलंब होत होता. गाड्यांचा वेगही कमी होता. त्यामुळे दहा-वीस मिनिटांच्या प्रवासाला तीन-चार तास लागत होते. लांब पल्ल्याच्या गाड्यांतील प्रवाशांचेही अतोनात हाल झाले. एक छोटासा अपघात किंवा बिघाड मुंबई नावाच्या देशाच्या राजधानीला बंद पाडू शकते याचे दर्शन पुन्हा एकवार झाले. दुर्दैवाने आपले राज्यकर्ते या यंत्रणा भक्कम करण्याऐवजी मुंबईतील गर्दी वाढवण्याच्या मागे आहेत. नवीन इमारती, रस्ते, उड्डाणपूल, भूमिगत रस्ते इत्यादी बांधणे म्हणजे विकास ही या राज्यकर्त्यांची समज मुंबईकरांच्या मुळावर येते आहे.

भुईसपाट

मध्य किंवा पश्चिम रेल्वेची यंत्रणा पूर्णपणे मोडकळीला आलेली आहे. गर्दीच्या भाराने ती वाकली नव्हे तर जवळपास भुईसपाट झाली आहे. या दोन्ही सेवांच्या लोकल गाड्या रोज किमान दहा ते पंधरा मिनिटे उशिराने धावत असतात. त्यामध्ये गर्दीचा कहर असतो. त्यातच आता एसी लोकल सुरू करून त्यांना इतर साध्या लोकलच्या अध्येमध्ये घुसवण्यात आले आहे. त्यामुळे सर्व वेळापत्रकाचे बारा वाजले आहेत. शिवाय एक एसी लोकल पुढे काढण्यासाठी चार साध्या गाड्या रोखून धरल्या जातात. त्यातून गर्दी चक्रवाढ दराने वाढत जाते. निव्वळ या कारणाने एखादे दिवशी अपघात होणार आहे. मागे प्रचंड गर्दीमुळे दिवा स्टेशनजवळ लोकलमधून पडून माणसे मेली होती. तसे आणखी प्रकार घडणार आहेत. पण रेल्वे खाते हे उत्तरेकडचे बाबू लोक चालवतात. त्यांना सामान्य मुंबईकरांची कसलीही पर्वा नाही. आणि यांच्या वर बसलेले अश्विनी वैष्णव यांच्यासारखे मंत्री आणि त्यांचे नरेंद्र मोदी नावाचे बॉस यांना फॅन्सी गाड्यांची हौस आहे. वंदे भारत सुरू करणे म्हणजे विकास अशी त्यांची समजूत झाली आहे. कोकण रेल्वेवर वंदे भारत, तेजस अशा गाड्या चालवल्या जातात. पण तुतारी किंवा दिवा पॅसेंजर या गाड्यांची अवस्था भयंकर असते. त्यांचे डबे गुरांची वाहतूक करायच्या देखील लायकीचे नसतात. या डब्यांमध्ये शौचालयांमध्ये पाणी नसते. शिवाय या गाड्या कायम चार ते पाच तास उशिरा धावत असतात. कोकणी माणसे याविषयी कधीही ओरडा करीत नसल्याने वर्षानुवर्षे हे असेच चालले आहे. हीच स्थिती आता मुंबईच्या लोकलची झाली आहे. तिथे उशिराने धावणाऱ्या लोकलविषयी कोणीही तक्रार करीत नाही. राजकीय पक्षांना हा प्रश्न महत्वाचा वाटत नाही. त्यामुळे रेल्वे खाते सोकावले आहे. कालच्या गोंधळात तीन प्रवाशांच्या झालेल्या मृत्यू प्रकरणी खरे तर रेल्वे अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. पण आपले गृहमंत्री फडणवीस किंवा लाडके भाऊ एकनाथ शिंदे केंद्राच्या खात्याच्या विरोधात अशी कारवाई करायला धजावणार नाहीत. तशी मागणीही करणार नाहीत.

जरा थांबा, विचार करा

सोमवारचा रेल्वेवरचा प्रकार हा मुंबईच्या व्यवस्था किती बेबंद झाल्या आहेत त्याची नुसती चुणूक होती. प्रचंड उड्डाणपूल करूनही आजही वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर दिवसरात्रीच्या कोणत्याही प्रहरात भीषण वाहतूक कोंडी असते. समुद्रातून कितीही रस्ते बांधले तरी ती कमी होणारी नाही. शिवाय समुद्री रस्त्यांचे दुष्कपरिणाम असतील ते वेगळेच. मुंबई ते नाशिक, मुंबई ते पुणे या मार्गांवरही सतत कोंडी झालेली असते. ठाणे, पालघरकडच्या भागातील रस्त्यांची अवस्था भीषण आहे. नवी मुंबई हे एक नियोजनबध्द शहर म्हणून वसवण्यात आले. पण आज त्याची दैना उडाली आहे. त्यात आता तिसऱ्या मुंबईची भर घातली जाणार आहे. उत्तरेला पालघरकडे चौथी मुंबई आणि आणखी तिसरीकडे पाचवी, सहावी किंवा सातवी मुंबईही आकाराला येईलच. ही वाढ सुदृढपणाचे लक्षण नाही. ही कर्करोगाच्या पेशींसारखी रोगट वाढ आहे. माणूस निरोगी असेल तर कोणत्याही आजाराचा मुकाबला झटपट आणि चांगला करू शकतो. पण मुळातच दुबळ्या, अनेक आजार असलेल्या माणसाला आणखी एक छोटा जरी आजार झाला तरी त्याची अवस्था बिकट होते. आजच्या मुंबईची अवस्था या दुसऱ्या माणसासारखी आहे. हे कालच्या प्रकारानंतर ठळकपणे लक्षात आले. कांजूरमार्गला लागलेली आग हा अपघात होता. तो कोठेही घडू शकतो हे मान्य आहे. पण तो घडल्यानंतर रेल्वे व्यवस्थेचा प्रतिसाद कसा होता हे महत्वाचे आहे. एक म्हणजे या घटनेबाबत तात्काळ प्रवाशांना योग्य त्या सूचना मिळतील अशी व्यवस्था करायला हवी होती. या बदलाचा फटका किती बसेल व दुरुस्तीला किती काळ लागेल याचे अनुमान बांधून लगेच रेल्वेच्या यंत्रणेमार्फत सर्वत्र त्याची घोषणा व्हायला हवी होती. पण रेल्वेचे नेहमीचे धोरण हे की, अशा घटना किरकोळ आहेत असे भासवून दडपादडपी करणे. सिग्नल बिघाडामुळे लोकल १५ ते २० मिनिटे उशिराने धावत आहेत अशी मोघम घोषणा अशा वेळी केली जाते. प्रत्यक्षात त्यावेळी प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या माणसाला लोकल एक तास लेट आहेत हे दिसत असते. शिवाय हा बिघाड किती मोठा किंवा छोटा आहे हे कळत नसल्याने स्टेशनमधील गर्दी वाढतच राहते. कालही हेच झाले व त्यातून अपघात झाले. नंतर हीच गर्दी रस्त्यावर गेली व तेथे उबर व ओलावाल्यांनी लोकांना लुटले. थोडक्यात एक फ्यूज उडाला तर सर्व शहराचे आयुष्य कसे बरबाद होऊ शकते याचे दर्शन काल घडले. मुंबईला मालगाडीप्रमाणे आणखी तिसऱ्या, चौथ्या किंवा पाचव्या मुंबई जोडण्यात येतील तेव्हा या शहराची अवस्था आणखी भीषण होईल. राज्यकर्ते तर बेमुर्वतच आहेत. पण जनतेने याचा जरा थांबून विचार करायला हवा.

विचार

पावसाळ्याची अस्वस्थ करणारी सांगता

यंदाच्या पावसाळ्याची देशाच्या वायव्य भागातून सुरू झालेली माघार आता महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर अअयेऊन ठेपली असून, राज्याच्या जवळपास निम्म्या भागातून पावसाने गाशा गुंडाळल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. पावसाचा हा झपाट्याने सुरू असलेला परतीचा प्रवास शेतीचे अर्थकारण, जलसाठ्यांचे व्यवस्थापन, रब्बीची पूर्वतयारी आणि ग्रामीण जनजीवनावर दूरगामी परिणाम करणार आहे.



नंदकुमार काळे

निसर्गाचे ऋतुचक्र हे पृथ्वीच्या अस्तित्वाचे शाश्वत गीत आहे. ग्रीष्माच्या दाहकतेने तप्त झालेली धरणी मृगाच्या पहिल्या सरींनी मोहरून उठते, नद्या-नाले खळाळू लागतात आणि काळ्या आईच्या उदरातून हिरवे अंकुर डोकावू लागतात. चार महिन्यांचा हा जलसोहळा केवळ एका ऋतूचा प्रवास नसतो, तर भारतीय उपखंडाच्या अर्थव्यवस्थेचा आणि जगण्याचा प्राणवायू असतो; परंतु निसर्गाचा नियम असा आहे, की प्रत्येक आगमनामागे एका निरोपाची वेळ ठरलेली असते. यंदाच्या मोसमी पावसानेही आता आपला मुक्काम आटोपता घेत माघारीची दिशा पकडली आहे. पुणे वेधशाळा आणि भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार महाराष्ट्रातील जवळपास निम्म्या प्रदेशातून मॉन्सूनने अधिकृतपणे माघार घेतली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या मोठ्या पट्ट्यातून पावसाचे सावट दूर झाले असून, निळेशार, स्वच्छ आणि निरभ्र आकाश पसरू लागले आहे. वातावरणातील गारवा आणि ढगांची सावली ओसरून दुपारच्या वेळी अंगाची लाही लाही करणारी उष्णता वाढू लागली आहे. हा केवळ एका पावसाचा निरोप नाही, तर एका संपूर्ण ऋतूचे दुसऱ्या ऋतूमध्ये होणारे गतिमान संक्रमण आहे. सामान्य माणसाला पाऊस थांबणे किंवा ऊन पडणे ही एक साधी गोष्ट वाटू शकते; परंतु हवामानशास्त्राच्या दृष्टीने मान्सूनचा परतीचा प्रवास ही प्रचंड गुंतागुंतीची आणि वेध घेण्याजोगी खगोलीय व वातावरणीय प्रक्रिया आहे.

हवामान विभागाच्या विश्लेषणावरून दिसून येते, की गेल्या काही काळात वातावरणातील सापेक्ष आर्द्रतेत कमालीची घट नोंदवली गेली आहे. बाष्पाचे प्रमाण घटल्यामुळे ढग निर्मितीची प्रक्रिया नैसर्गिकरीत्या थांबली आहे. या बदलामागील मुख्य शास्त्रीय कारण म्हणजे उत्तर गुजरात आणि लगतच्या नैऋत्य राजस्थान परिसरात निर्माण झालेली 'प्रतिचक्राकार' वाऱ्यांची स्थिती. एखाद्या भूभागावर वातावरणाचा उच्च दाब निर्माण होतो, तेव्हा वारे केंद्राकडून बाहेरच्या दिशेने चक्राकार गतीने फेकले जातात. या प्रतिचक्राकार स्थितीमुळे अरबी समुद्रावरून आणि बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या बाष्पयुक्त नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा मार्ग पूर्णपणे रोखला गेला आहे. त्यांच्या जागी उत्तर आणि वायव्येकडून येणारे कोरडे, उष्ण वारे वेगाने वाहू लागले आहेत. या कोरड्या वाऱ्यांनी बाष्पाचा लवलेशही उरू न दिल्याने संपूर्ण आकाशातून ढगांचे आच्छादन नाहीसे झाले आहे. सूर्यकिरणे कोणत्याही अडथळ्याविना थेट जमिनीवर आदळू लागल्याने तापमानाचा पारा अचानक उसळला असून, यालाच आपण लोकभाषेत 'ऑक्टोबर हिट' म्हणून ओळखतो. यंदाच्या मॉन्सूनच्या परतीचा आलेख पाहिला, तर तो आश्चर्यकारक रीतीने वेगवान राहिल्याचे स्पष्ट होते. साधारणपणे १९ सप्टेंबर रोजी मॉन्सूनने पश्चिम राजस्थानच्या वाळवंटी भागातून परतीचा पहिला टप्पा गाठला होता. वातावरणात अनुकूल स्थिती असल्याने अवघ्या चार दिवसांमध्ये, म्हणजेच २३ सप्टेंबरपर्यंत देशाच्या संपूर्ण वायव्य भागातून मोसमी वारे पूर्णपणे बाहेर पडले. त्यानंतरचा प्रवास तर अधिकच थक्क करणारा ठरला.

ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत उत्तर भारताच्या बहुतांश भागासह संपूर्ण गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि छत्तीसगड या विस्तीर्ण राज्यांमधून पावसाने संपूर्ण माघार घेतली. आता ही माघारीची रेषा महाराष्ट्राच्या मधोमध येऊन ठेपली आहे. पोषक कोरडे वातावरण आणि उच्च दाबाचा पट्टा कायम राहिल्याने पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये विदर्भाचा उर्वरित भाग, मराठवाड्याचा बहुतांश परिसर, मध्य महाराष्ट्राचा उर्वरित भाग तसेच शेजारील तेलंगण आणि उत्तर कर्नाटकमधूनही मोसमी वारे पूर्णपणे परतण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. चार महिन्यांच्या प्रदीर्घ वास्तव्यानंतर मोसमी वाऱ्यांचे हे जलद प्रयाण हवामानातील मोठ्या स्थित्यंतराची साक्ष देते. महाराष्ट्रासारख्या शेतीप्रधान राज्यासाठी मॉन्सूनचा परतीचा टप्पा हा नेहमीच दुधारी तलवारीसारखा असतो. सध्या राज्यातील शेतकरी खरीप पिकांच्या सुगीच्या तयारीत व्यस्त आहे. सोयाबीन, उडीद, मूग ही पिके कापणीला आली असून अनेक ठिकाणी मळणीची कामे सुरू आहेत; तर दुसरीकडे कपाशी, तूर आणि बाजरीची पिके निर्णायक टप्प्यात उभी आहेत. अशा वेळी पावसाने उघडीप देणे आणि कडक ऊन पडणे हे खरिपाच्या काढणीसाठी अत्यंत फायदेशीर ठरते. उघडीप मिळाल्याने शेतातील काढणीची कामे निर्विघ्न पार पडू शकतात, धान्याला बुरशी लागण्याचा धोका टळतो आणि शेतमालाची प्रत टिकून राहण्यास मदत होते; परंतु या चित्राला दुसरी आणि गंभीर बाजूही आहे.

पावसाने अनपेक्षितपणे घेतलेली जलद माघार आणि उन्हाची अचानक वाढलेली तीव्रता यामुळे जमिनीतील ओल वेगाने आटण्याची भीती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेती ही मोठ्या प्रमाणावर पावसाने जमिनीत सोडलेल्या ओलाव्यावर अवलंबून असते. आगामी रब्बी हंगामात हरभरा, रब्बी ज्वारी, गहू आणि तेलबियांची पेरणी करायची असेल, तर जमिनीच्या थरामध्ये पुरेशी ओल शिल्लक राहणे अनिवार्य असते. ऑक्टोबर हिटच्या तीव्र चटक्यांमुळे ही ओल वेगाने उडून गेली, तर रब्बीच्या पेरण्या अडचणीत येऊ शकतात. त्यामुळे एकीकडे खरिपाचे पीक सुरक्षितपणे घरात आणतानाच, दुसरीकडे रब्बीसाठी उपलब्ध ओलाव्याचा पुरेपूर वापर करण्याचे मोठे आव्हान बळीराजासमोर उभे ठाकले आहे. यंदाच्या पावसाने राज्याला सर्वसाधारणपणे दिलासा दिला असला, तरी अनेक धरणांमधील पाणीसाठा समाधानकारक पातळीवर पोहोचला आहे. कोयना, जायकवाडी, उजनी यांसारख्या प्रमुख धरणांसह स्थानिक जलप्रकल्पांमध्ये बऱ्यापैकी पाणी जमा झाले आहे. ही बाब आगामी उन्हाळ्याच्या दृष्टीने निश्चितच दिलासादायक आहे; मात्र पावसाने मुक्काम लवकर आटोपल्यामुळे आता उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन अत्यंत काटेकोरपणे करावे लागणार आहे.

तापमानात अचानक वाढ झाल्यामुळे धरणांमधील आणि खुल्या जलाशयांमधील पाण्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात वाढते. ऑक्टोबरपासूनच बाष्पीभवनाचा वेग वाढला, तर उन्हाळ्याच्या तोंडावर पाणीटंचाईची तीव्रता अधिक जाणवू शकते. यासाठी जलसंपदा विभाग, स्थानिक प्रशासन आणि खुद्द नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळणे गरजेचे आहे. शेतीसाठी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींचा प्रभावी वापर करणे, कालव्यांऐवजी बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी देणे आणि भूजल पुनर्भरण अधिक गांभीर्याने घेणे या गोष्टी आता केवळ पर्याय न राहता अपरिहार्यता बनल्या आहेत. पाऊस लवकर परतल्याने पाण्याच्या शहाणपणाच्या वापराची परीक्षा आतापासूनच सुरू झाली आहे. गेल्या काही दशकांमधील हवामानाचा कल पाहिला, तर मॉन्सूनच्या वर्तणुकीत प्रचंड अनिश्चितता आलेली दिसते. कधी मॉन्सून वेळेपूर्वी येतो, कधी उशिरा दाखल होतो, कधी अवकाळी अतिवृष्टी होऊन शेतीचे होत्याचे नव्हते होते, तर कधी परतीचा प्रवास चक्क नोव्हेंबरपर्यंत लांबतो. यंदा मात्र पावसाने अतिशय जलद गतीने घेतलेली माघार ही 'ग्लोबल वॉर्मिंग' आणि हवामानबदलाच्या वाढत्या प्रभावाकडे अंगुलीनिर्देश करते. वातावरणातील घटकांची ही टोकाची आंदोलने भविष्यातील संकटांची नांदी ठरू शकतात.

हवामानातील या अचानक बदलाचा मानवी आरोग्यावरही तीव्र परिणाम होताना दिसतो. पावसाळ्यातील दमट आणि थंड वातावरणातून अचानक कोरड्या आणि तीव्र उकाड्याच्या वातावरणात होणारा प्रवेश मानवी शरीराला एकदम सहन होत नाही. दिवसा अंगाची लाही लाही करणारे कडक ऊन आणि रात्री हलकी गार हवा या विषम तापमानामुळे विषाणूजन्य ताप, सर्दी, खोकला, डिहायड्रेशन आणि त्वचारोगांचे प्रमाण वाढू लागते. त्यामुळे नागरिकांनाही या ऋतूबदलाच्या काळात आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. शेवटी, निसर्गाच्या या विराट रंगमंचावर प्रत्येक ऋतूला स्वतःचे एक वेगळे सौंदर्य आणि कर्तव्य असते. चार महिने आभाळातून अविरत कोसळून तहानलेल्या वसुंधरेला नवजीवन देणारा मेघराजा आता आपल्या कर्तव्याची सांगता करून शांत झाला आहे. त्याने दिलेले जलवैभव पदरात बांधून भावी काळाचे नियोजन करण्याची जबाबदारी आता मानवाची आहे. महाराष्ट्राच्या निम्म्या भागातून पावसाने घेतलेली ही माघार आपल्याला हेच सांगते, की आता भूतकाळातील पावसाच्या आठवणींपेक्षा भविष्यातील रब्बी हंगाम, जलव्यवस्थापन आणि आगामी गुलाबी थंडीच्या स्वागताची तयारी करण्याची वेळ आली आहे. निसर्गाच्या या परतीच्या पावलांना कृतज्ञतेने निरोप देत, संतुलित जीवनशैली आणि पर्यावरणस्नेही दृष्टीकोन स्वीकारून नव्या ऋतूच्या स्वागतासाठी सज्ज होणे हीच काळाची खरी गरज आहे.

चर्चा आजची

विकासाच्या नावाखाली निसर्गाची विक्री



वैभव पाटील

मोठमोठे रस्ते बनवले, महामार्ग बांधले, ब्रिज बनवले, बुलेट ट्रेन आणली, मेट्रो सुरू केली, नवी शहरे वसवली. त्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी अजस्त्र धरणे बांधली की विकास झाला, अशा विकासाच्या भ्रामक कल्पनेतून आपण बाहेर पडले पाहिजे. डोंगर, नद्या-नाले, समुद्र, जंगले कायम ठेवून त्यांना धक्का न लागता शाश्वत विकासाच्या कल्पना आपण मांडल्या पाहिजेत. येणारी संकटे पुढील विनाशाची चाहूल देत असतात. ग्लोबल वॉर्मिंगमुळे प्रचंड तापमानवाढ होत आहे. अशा वातावरणात माणूस जगू शकत नाही. निसर्ग मानवी जीवनात फार ढवळाढवळ करत नाही, पण माणसाने जर निसर्गात अनियंत्रित हस्तक्षेप केला तर निसर्ग मात्र स्वतःला वाचवण्यासाठी आवश्यक पावलं जरूर उचलतो, हे कोरोना काळात आपण अनुभवले आहे. अशातच कर्जत तालुक्यातील कर्जत-भीमाशंकर जंगल परिसरात टोरेंट जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पासाठी हजारो झाडांची कत्तल सुरू आहे. या प्रकल्पामुळे अडीच लाखांहून अधिक झाडांना धोका निर्माण झाल्याचा दावा पर्यावरणप्रेमींकडून केला जात आहे. तब्बल १३ हजार ५०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी जंगलाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वृक्षतोडीमुळे पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. संबंधित परिसरात यंत्रसामग्री, कटर आणि मनुष्यबळाच्या मदतीने मोठ्या वृक्षांची कत्तल सुरू असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. या वृक्षतोडीमुळे जंगलातील पक्षी, वन्यजीव आणि इतर जीवांचा नैसर्गिक अधिवास धोक्यात येण्याची शक्यता आहे. मात्र, आतापर्यंत नेमकी किती झाडे तोडण्यात आली आणि एकूण किती वृक्षतोडीला अधिकृत मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पाची प्रस्तावित क्षमता तीन हजार मेगावॅट इतकी आहे. वीजनिर्मिती आणि ऊर्जा साठवणुकीच्या उद्देशाने हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आलेल्या पर्यावरणीय अहवालानुसार, या प्रकल्पासाठी सुमारे ३७७ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. यामध्ये २३३ हेक्टर वनजमिनीचा समावेश असून, हे क्षेत्र सुमारे ५७६ एकर इतके आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या उभारणीसाठी वनक्षेत्रावर होणारा परिणाम आणि वृक्षतोडीचे संभाव्य प्रमाण याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. एकीकडे वाढती विजेची गरज भागवण्यासाठी ऊर्जा प्रकल्प महत्त्वाचे मानले जात आहेत, तर दुसरीकडे या प्रकल्पांमुळे जंगल आणि जैवविविधतेवर होणाऱ्या परिणामांचा प्रश्नही गंभीर बनला आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्यास वन्यजीवांचे अधिवास नष्ट होण्याबरोबरच जंगलातील पर्यावरणीय संतुलनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वृक्षतोडीची प्रत्यक्ष संख्या, मंजूर वनक्षेत्र, वन्यजीव संरक्षणासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना आणि पुनर्वनीकरणाचा आराखडा याबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी स्थानिक आणि पर्यावरणप्रेमींकडून केली जात आहे.

आज ऐन थंडीत घराबाहेर पाऊल टाकले की अंगाची लाहीलाही होत आहे. उन्हाच्या या भीषण तीव्रतेने जिल्ह्याची राखरांगोळी झाली आहे. शेतकऱ्याच्या डोळ्यादेखत उभी पीक करपून गेली आहेत. सामान्य माणसाला प्यायला पाण्याचा घोट उरलेला नाही. आपण आकाशाकडे बघून निसर्गाला दोष देत आहोत. ज्या सह्याद्रीच्या कुशीत शिवरायांनी स्वराज्य घडवले. ज्याच्या कड्याकपाऱ्यांनी दिल्लीच्या तख्तालाही घाम फोडला, तोच सह्याद्री आज उद्योगपतींच्या घशात घातला जात आहे. आतापर्यंत आपण थोडेफार सुरक्षित होतो, ते याच सह्याद्रीच्या कृपेने. पण आज एका बाजूला दुष्काळात सर्वसामान्य माणूस अंघोळीचे उरलेले पाणी वापरून अंगणातली दोन झाडे कशीबशी जगवण्याची धडपड करत आहे, आणि दुसरीकडे कर्जत परिसरात भांडवलशहांच्या महाकाय प्रकल्पांसाठी हजारो झाडांची निर्घृण कत्तल दिवसाढवळ्या सुरू आहे. तीन हजार मेगावॅट क्षमतेच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी जंगलाचा किती ऱ्हास होणार आणि पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. इकडे माणसाच्या घशाला कोरड पडली असताना, आपल्या हक्काच्या नद्या आणि धरणे या उद्योगपतींच्या पायावर वाहिली जात आहेत.

झाड तोडल्यानंतर दुसरीकडे रोप लावल्याची पाटी लावता येते; पण जुन्या वृक्षाची सावली, त्यावरचा पक्ष्यांचा संसार आणि वर्षानुवर्षे तयार झालेली परिसंस्था एका दिवसात उभी करता येत नाही. सर्वांत मोठा विरोधाभास असा आहे की, विकासाच्या नावाखाली आपण निसर्गाची संपत्ती खर्च करतोय आणि त्याच वेळी पर्यावरण वाचवण्याचे आवाहनही करत आहेत. सरकार, प्रशासन, विकासक आणि नागरिक-सर्वांनीच एक प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे. प्रकल्पाची गरज जितकी महत्त्वाची आहे, तितकंच झाड वाचवण्याचा पर्याय तपासणे महत्त्वाचे आहे. परवानगी मिळाली म्हणजे प्रत्येक पर्यावरणीय प्रश्न संपला, असे मानता येत नाही. पर्यायी आराखडे, पारदर्शक निर्णय, वृक्षसंवर्धन आणि लावलेल्या झाडांच्या जगण्याची खात्री यांनाही तितकंच महत्त्व आहे. कारण निसर्गाचा नाश झाला तर त्याची किंमत केवळ आजची पिढी मोजणार नाही तर पुढच्या पिढ्यांनाही ती चुकवावी लागेल. विकासाला विरोध कोणाचाच नाही. पण विकास म्हणजे निसर्गाचा बळी देणे नव्हे. विकास म्हणजे रोजगार, उद्योग आणि पर्यावरण यांचा समतोल साधणे. जर त्या नावाखाली डोंगर उध्वस्त होत असतील, जंगलांचा नाश होत असेल, शेती ओस पडत असेल आणि गावांचे भवितव्य अंधारात ढकलले जात असेल, तर तो विकास नसून विनाश आहे.

लोकसंसद

१०० टक्के इथेनॉल इंधन, निर्णय अत्यंत स्वागतार्ह!

केंद्र सरकारने केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ मध्ये सुधारणा करून ई१०० (१०० टक्के इथेनॉल) इंधनाला नियामक मान्यता देण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे विविध प्रमाणात इथेनॉल आणि पेट्रोल वापरू शकणाऱ्या 'फ्लेक्स-फ्युएल' इंजिन वाहनांच्या निर्मितीचा मार्ग मोकळा झाला असून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी तो महत्त्वाचा ठरणार आहे. आज आपला देश कच्च्या तेलाच्या आयातीवर मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्च करतो. ई १०० इंधनाच्या वापरामुळे ही आयात लक्षणीयरीत्या कमी होऊन देशाची मोठ्या प्रमाणात आर्थिक बचत होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे इथेनॉल हे प्रामुख्याने ऊस आणि धान्य अशा शेती उत्पादनांपासून बनवले जात असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल आणि शेतकऱ्यांना हक्काचे पैसे मिळतील. पारंपारिक इंधनाच्या तुलनेत इथेनॉलमुळे वायुप्रदूषण खूप कमी होत असल्याने शहरांमधील हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल. आज जगातील ६० पेक्षा जास्त देशांमध्ये इथेनॉलचा वापर वाहतुकीचे इंधन म्हणून केला जात असून अनेक देशांनी पेट्रोलमध्ये ठराविक प्रमाणात इथेनॉल मिसळणे कायदेशीररित्या बंधनकारक केले आहे. ब्राझील ३० ते ३२ टक्के, पॅराग्वे आणि झिम्बाब्वे २० ते ३० टक्के, अमेरिका १० ते १५ टक्के, फ्रान्स, जर्मनी, स्वीडन बेल्जियमसह युरोपमधील इतर २० देश तसेच कॅनडा, युनायटेड किंगडम, ऑस्ट्रेलिया, चीन, कोलंबिया आणि फिलीपिन्स या देशांनी पेट्रोलमध्ये १० टक्क्यांपर्यंत इथेनॉल मिसळणे अनिवार्य केले आहे.

- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन



१८९२ मध्ये याच दिवशी पॅरिसमध्ये ग्रेव्हीन म्युझियममध्ये चार्ल्स इमाईल रेनॉडस् यांच्या जगातल्या ऐतिहासिक पहिल्याच ॲनिमेशनपट निर्मितीचे प्रदर्शन झाले होते. द असोसिएशन ऑफ इंटरनॅशनल फिल्म्स् द ॲनिमेशन म्हणजेच असिफा या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या पुढाकाराने हा दिन आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन म्हणून ५० पेक्षा जास्त देशांत १००० पेक्षा जास्त इव्हेंटस्मधून साजरा केला जातो.

ॲनिमेशन ही एक शक्तिशाली कला आहे जी विविध संस्कृती, कथा, आणि कल्पना जगभरातील प्रेक्षकांसमोर सादर करते. लहान मुलांसाठीच्या कार्टूनपासून ते प्रौढांसाठीच्या चित्रपटांपर्यंत ॲनिमेशनचे क्षेत्र विशाल आहे, आणि त्यामधील तांत्रिक प्रगतीमुळे या माध्यमाने मनोरंजन आणि शिक्षण क्षेत्रात महत्त्वाची जागा मिळवली आहे. या दिवशी, जगभरात ॲनिमेशन फिल्म फेस्टिव्हल्स, कार्यशाळा, आणि प्रदर्शनं आयोजित केली जातात, ज्यामध्ये कलाकार, विद्यार्थी आणि प्रेक्षक एकत्र येऊन ॲनिमेशनच्या विविध प्रकारांचा आनंद घेतात. आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन हा सर्जनशीलतेचा उत्सव असून, त्याद्वारे कलाकारांच्या कल्पनाशक्तीला आणि मेहनतीला सन्मान दिला जातो.

ॲनिमेशन म्हणजे लहान मुलांचेच कार्यक्रम असा गैरसमज आहे. ९० टक्के कार्टून शैलीतच ॲनिमेशन फिल्म्स जगभर बनविल्या गेल्यात. कार्टून शैली ही मुळात चित्र रेखाटण्यास सोपी, मूलभूत आकाराचा उपयोग जास्त करता येण्याजोगी, लक्षवेधक, विनोद रसप्रधान व ॲनिमेशन शैली आणि तंत्रास सहज झेपणारी आहे.ॲनिमेशन हे फ्रेम बाय फ्रेम आणि दृष्टीसातत्य या तंत्रावर आधारित असल्यामुळे एका सेकंदाच्या हालचाली पडद्यावर दाखविण्यास २४ फ्रेम्स चित्रित कराव्या लागतात. यासाठी कार्टून म्हणजेच मूलभूत आकाराने प्रत्येक फ्रेममधील पात्राची हालचाल चित्रित करण्यास सोपी जावी म्हणून जगभर मान्यता पावलेली शैली आहे. ॲनिमेशन हा प्रकार सुरुवातीला व्यावसायिक रंगभूमीवर सुरू झाला, परंतु आता तो थ्रीडी आणि स्पेशल इफेक्ट्ससह मोठ्या पडद्यावर पोहोचला आहे.

ॲनिमेशन क्षेत्रात करिअर करण्याची मोठी संधी आहे. आजकाल ॲनिमेशनची मागणी चित्रपट, जाहिराती, गेम्स आणि वेब सिरीजमध्ये वाढत चालली आहे. ॲनिमेशन क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम ते तीन वर्षांचे पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. बारावीनंतर थ्रीडी ॲनिमेशन सर्टिफिकेट, सीजी आर्टस्, टूडी सर्टिफिकेट, ऋएडिटिंग, मिक्सिंग आणि पोस्ट प्रोडक्शन वर्कसफ आणि व्हीएफएक्स यांसारखे अनेक प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहेत, जे ३ ते ६ महिन्यांत पूर्ण करता येतात. याशिवाय, बीएससी इन ॲनिमेशन, बीए इन ॲनिमेशन आणि ग्राफिक डिझाईन, बी.डेस. इन ॲनिमेशन आणि डिजिटल फिल्ममेकिंग अशा अनेक पदवी अभ्यासक्रमांमध्येही शिक्षण घेता येते.

आज आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन साजरा करण्यामागचा उद्देश ॲनिमेशनच्या माध्यमातून मनोरंजन आणि कला क्षेत्रात होणाऱ्या बदलांविषयी लोकांमध्ये जागरूकता वाढवणे आहे. यानिमेशन क्षेत्रात दररोज नवनवीन तंत्रज्ञान येत आहे आणि यामुळे मनोरंजन क्षेत्रातही आमूलाग्र बदल होत आहेत.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ ऑक्टोबर

१) श्री.गजानन विनायक जोशी
चेंढरे, अलिबाग
२८-१०-१९६१

२) श्री.संतोष रामकृष्ण वाकडे
चेंढरे, अलिबाग
दि.२८-१०-१९६०

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

टपऱ्यांमुळे पेण शहराचे विद्रूपीकरण

• चिंचपाडा रोडवरील अतिक्रमण हटविण्याची मागणी

। पेण । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन नगरपालिकेने टपऱ्यांविरोधात कारवाई करत समुद्रकिनाऱ्यावरील अतिक्रमणे हटविली, मग पेण नगरपालिका शहरातील टपऱ्यांच्या अतिक्रमणांवर कारवाई कधी करणार? असा सवाल आता उपस्थित होत आहे. शहरातील विविध भागांत वाढलेल्या टपऱ्यांमुळे सार्वजनिक जागांचा वापर, रस्त्यांची उपलब्धता आणि शहराच्या सौंदर्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात टपऱ्या उभारण्यात आल्याने किनाऱ्याच्या सौंदर्याला बाधा पोहोचत असल्याची बाब समोर आल्यानंतर तेथील नगरपालिकेने अतिक्रमणांविरोधात कारवाई केल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर पेण नगरपालिकाही शहरातील अनधिकृत टपऱ्यांविरोधात अशीच ठोस भूमिका घेणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.



पेण शहरात अनेक ठिकाणी टपऱ्यांचे जाळे वाढल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे शहराच्या नियोजनावर आणि सौंदर्यावर परिणाम होत असल्याच्या तक्रारी आहेत. विशेषतः नव्याने विकसित करण्यात आलेल्या चिंचपाडा रोडवर टपऱ्यांचे अतिक्रमण झाल्याचा आरोप होत आहे. रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेल्या टपऱ्यांमुळे रस्त्याची जागा कमी होत असेल, तर त्याची प्रत्यक्ष पाहणी करून नगरपालिका प्रशासनाने तातडीने योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे.

पेणमधील सरकारी रुग्णालयाच्या मागील परिसरातही टपऱ्यांच्या माध्यमातून हॉटेल व्यवसाय सुरू असल्याचे सांगितले जात आहे. संबंधित व्यावसायिकांकडे आवश्यक परवाने आणि अन्न व औषध प्रशासनाची मान्यता आहे की नाही, याची तपासणी करण्याची मागणी होत आहे. मात्र, याबाबत अधिकृत कागदपत्रांची पडताळणी होणे आवश्यक आहे.

सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करून व्यवसाय सुरू केला असल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन केले जाते की नाही, याचीही संबंधित विभागाने तपासणी करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करताना सर्व व्यावसायिकांना समान निकष लागू केले पाहिजेत.

नगरपालिका प्रशासन नेमकी भूमिका घेणार कधी?

शहराचा विकास केवळ रस्ते बांधून किंवा नवीन कामे करून होत नाही; तर सार्वजनिक जागांचे नियोजन, अतिक्रमणांवर नियंत्रण आणि स्वच्छतेची अंमलबजावणी यांनाही तितकेच महत्त्व आहे. नव्याने विकसित केलेल्या रस्त्यांवरच अतिक्रमण होत असेल, तर विकासकामांचा अपेक्षित फायदा नागरिकांना कसा मिळणार, असा प्रश्न उपस्थित होतो. श्रीवर्धन नगरपालिकेने अतिक्रमणांविरोधात कारवाई केल्याचा आदर्श समोर असताना पेण नगरपालिका त्यातून काय बोध घेणार? चिंचपाडा रोडपासून सरकारी रुग्णालयाच्या मागील परिसरापर्यंत अतिक्रमणांच्या तक्रारींची दखल घेऊन प्रशासन प्रत्यक्ष कारवाई करणार की केवळ पाहणी आणि आश्वासनांवरच समाधान मानणार, याकडे पेणकरांचे लक्ष लागले आहे.



सानेगाव येथे बंधारा उभारला

। रोहा । प्रतिनिधी ।

दुष्काळाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी रायगड जिल्हा परिषद प्रशासन अलर्ट झाला असून रोहा तालुक्यातील सानेगाव ग्रामीण भागात प्रशासन व ग्रामस्थांच्या सहकार्यातून वनराई बंधारा उभारण्यात आला. व पुढे शंभर वनराई बंधारे तालुक्यात बांधण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. ग्रामस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले यांनी गावाला धावती भेट देत श्रमदान करणाऱ्या ग्रामस्थांचे आभार मानले. दरम्यान भविष्यातील पाणी टंचाईचा धोका ओळखून प्रशासन राबवित असलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

'बाटू'ची क्रिस्किट फॉल फेस्टसाठी निवड

। महाड । प्रतिनिधी ।

लोणेरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची (बाटू) आयबीएमच्या 'क्रिस्किट फॉल फेस्ट २०२६' या जागतिक उपक्रमासाठी जगभरातील १६० संस्थांमध्ये निवड झाली आहे. यानिमित्त २६ ते २८ ऑक्टोबरदरम्यान विद्यापीठात आयोजित तीन दिवसीय क्वांटम तंत्रज्ञान प्रशिक्षण, कार्यशाळा व हॅकॅथॉनचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत झाले.

या उपक्रमात राज्यातील सुमारे १५० विद्यार्थी आणि ५० प्राध्यापक सहभागी झाले असून, आयबीएम, आयसर आणि नॅसकॉमच्या तज्ज्ञांकडून



मार्गदर्शन केले जात आहे. महाराष्ट्र क्वांटम तंत्रज्ञान मिशनअंतर्गत विद्यापीठाला २.५ कोटींचा निधी मंजूर झाला असून, त्यातून अत्याधुनिक क्वांटम प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे.

यावेळी मान्यवरांनी विद्यापीठाच्या बांबू कौशल्य विकास व संशोधन केंद्र आणि इनक्युबेशन केंद्राला भेट दिली. बांबू उद्योगातून स्थानिक रोजगारनिर्मिती, विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप्सना प्रोत्साहन आणि उद्योजकतेला चालना देण्याच्या विद्यापीठाच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले.

तसेच, रोटरी इंटरनॅशनलच्या सहकार्याने लोणेरे परिसरात उभारलेल्या दोन बंधाऱ्यांची पाहणी करण्यात आली. या बंधाऱ्यांमुळे आणि जलसंधारण उपक्रमांमुळे ३० हून अधिक गावांच्या पाणीपुरवठ्याला आधार मिळाला आहे.

'सी फूड प्लाझा' मुंबईकरांच्या सेवेत

कोळी गीतांचा, पदार्थांचा आस्वाद

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईकरांना दर्जेदार, ताज्या आणि चविष्ट अशा माशांच्या मेजवानीचा आस्वाद उपलब्ध करून देण्यासाठी मुंबईतील पहिला 'सी फूड प्लाझा' माहीम चौपाटी परिसरात पुन्हा एकदा सज्ज झाला आहे. शनिवार (दि.२४) पासून माहीम सी फूड प्लाझा येथे महिला बचत गटांचे स्टॉल्स् कार्यरत झाले आहेत. हा सी फूड प्लाझा आठवड्यात दर बुधवार, शुक्रवार, शनिवार आणि रविवारी खुला राहणार आहे.



आकर्षक रंगसंगती, सेल्फी पॉइंट, आरामदायी आसन व्यवस्था आणि स्थानिक कोळी गीतांचा आणि पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी सर्वतोपरी व्यवस्था यानिमित्ताने उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुंबईतील कोळीवाड्यांच्या ठिकाणी सुशोभीकरण करतानाच महिला बचतगट आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासह पर्यटन वृद्धीसाठी मुंबईतील पहिला 'सी फूड प्लाझा' माहीम चौपाटी लगत सुरू करण्यात आला. मागील काही वर्षांपासून या सी फूड प्लाझाला हजारो पर्यटकांनी आतापर्यंत भेट दिली आहे. माहीम चौपाटी स्थित सी फूड प्लाझाच्या ठिकाणी आकर्षक अशा रोशणाई करण्यात आली आहे. नागरिकांना आणि पर्यटकांना सेल्फी पॉइंटच्या ठिकाणी छायाचित्रं घेण्याचीही उत्तम व्यवस्था उपलब्ध आहे. या महिला बचत गटांना मत्स्य उत्पादनावर आधारित प्रशिक्षणही देण्यात आले आहे.

सर्पमित्रांकडून अजगराला जीवदान

उरण : पनवेल तालुक्यातील पुष्पक नगर येथे मंगळवारी (दि.२७) नाल्यामध्ये अजगर आढळले. याची माहिती मिळताच सर्पमित्रांनी तत्परतेने घटनास्थळी धाव घेतली. सुमारे १० फूट लांबीच्या इंडियन रॉक पायथन या अजगराला केअर ऑफ नेचरचे पनवेल विभाग प्रमुख तथा सक्रिय सदस्य तथा सर्पमित्र साजन सुनील वास्कर आणि प्रज्वल शिंदे यांनी सुरक्षितपणे रेस्क्यू केले. त्यानंतर या अजगराला नैसर्गिक अधिवास असलेल्या जंगलात सुखरूप सोडण्यात आले.

नंदकुमार तेलंगे यांचा सत्कार



सुतारवाडी : महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, शाखा रोहा यांच्या वतीने नंदकुमार तेलंगे यांची कोलाड प्रभागाच्या शिक्षण विस्तार अधिकारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. तसेच, त्यांना पुढील प्रशासकीय व शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

शिक्षण क्षेत्रातील जबाबदारी ही केवळ पदाची नसून भावी पिढीचे भविष्य घडविण्याची असते. तेलंगे यांच्या अनुभवाचा व कार्यकौशल्याचा लाभ कोलाड प्रभागातील शैक्षणिक विकासाला होऊन शैक्षणिक गुणवत्तावाढीस नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

रत्नागिरी : देवरुख येथील झेपले वाडी परिसरात राहणाऱ्या तरुणाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. धीरज झेपले (२७) असे मृत तरुणाचे नाव आहे. धीरज हे त्यांच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या स्नानगृहामध्ये अंघोळीला पाणी आणण्यासाठी गेले होते. यावेळी घराच्या घपरावर बसवलेल्या लोखंडी अँगलमध्ये विद्युत प्रवाह उतरला होता. पाणी घेताना त्यांच्या हात चुकून त्या अँगलला लागला आणि त्यांना विजेचा जोरदार धक्का लागून त्यांचा मृत्यू झाला.

एसटी डेपोच्या दुरवस्थेमुळे विकासाचे दावे फोल

। पनवेल । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते थर्ड मुंबई व नैना प्रकल्पाच्या विकासकामांचे भूमीपूजन झाले, मात्र पनवेलच्या एसटी डेपोच्या दुरावस्थेमुळे विकासाचे दावे फोल ठरत आहेत. रुपयांच्या प्रकल्पांची स्वप्ने दाखवणारे प्रशासन आणि कर्ते स्थानिक पातळीवरील अत्यंत मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागात असलेला पनवेल एसटी डेपो आज अक्षरशः दुरवस्थेच्या खाईत लोटला गेला आहे. डेपोची संपूर्ण व्यवस्था कोलमडली आहे. प्रवाशांसाठी अपुऱ्या सुविधा, खड्ड्यांचे साम्राज्य, पिण्याच्या पाण्याची आणि स्वच्छतेची दुर्दशा यामुळे विकासाची वाट पाहत पडलेला एसटी डेपो असे चित्र येथे पाहायला मिळत आहे.

पनवेल बस डेपोमधून कोकण विभाग तसेच पश्चिम महाराष्ट्रात जाणाऱ्या गाड्यांची वर्दळ पहावयास मिळत असते. मात्र या डेपोची दुरावस्था गेले १५ ते २० वर्षापासूनचे पहावयास मिळत आहे. संपूर्ण पनवेलचा विकास पाहावयास मिळतो, मात्र बस डेपोचा विकास का रखडतो? असा प्रश्न प्रवासी आणि येथील रहिवाशांना पडला आहे. याबाबत प्रवाशांनी वेळोवेळी पनवेलच्या आमदारांना निवेदन दिले, त्यांनी याची पाहणी केली. नुकतेच महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनीसुद्धा या डेपोची पाहणी केली. मात्र डेपोची सुधारणा करण्याची सुरुवात अजून झालेली नाही.

मोठे विमानतळ आणि थर्ड मुंबईच्या वल्गना करताना, सामान्य प्रवाशांची रोजची वाहतुकीची आणि एसटी डेपोची हेळसांड होत असेल, तर हा विकास नेमका कोणासाठी? असा बोचरा सवाल पनवेलमधील नागरिक आणि प्रवासी करत आहेत.

जल व वन संवर्धन मोहीमेला सुरूवात **स्थलांतर थांबण्यास मोठी मदत**

वन्यजीवांसाठी 'वनतलाव' ठरणार संजीवनी

। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।

एल-निनोमुळे तापमानवाढ, भीषण दुष्काळ, जंगलांना लागणारे वणवे आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या गंभीर संकटांच्या छायेत वन्यजीवांच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. या बिकट परिस्थितीत मूक वन्यजीवांची तहान भागवण्यासाठी तसेच रोजगार आणि जल-वन संवर्धनासाठी नेरे नानोसे येथे एक अत्यंत कौतुकास्पद व प्रेरणादायी पाऊल उचलण्यात आले आहे.

सामूहिक वनव्यवस्थापन समिती (नेरे नानोसे), वन विभाग, एकात्मिक आदिवासी विकास विभाग, पंचायत समिती (सुधागड पाली), वातावरण फाउंडेशन आणि बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशन



यांच्या अभूतपूर्व समन्वयातून सामूहिक वनहक्क क्षेत्रात 'वनतलाव' खोदण्याच्या मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे.

कंपार्टमेंट क्र.६५९मधील सामूहिक वनहक्क मान्यता प्राप्त वनक्षेत्रात शुक्रवारी (दि.२३) या मोहिमेचे उद्घाटन रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्या हस्ते प्रतीकात्मक खोदकाम करून झाले. यावेळी प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड म्हणाले, नेरे नानोसेच्या सामूहिक वनव्यवस्थापन समितीने वन्यजीव व जैवविविधता जोपासण्यासाठी हाती घेतलेले हे काम अत्यंत दिशादर्शक आहे. तसेच, त्यांनी सर्व प्रशासकीय विभागांना या जल व वन संवर्धन मोहिमेला पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देश दिले. कार्यक्रमादरम्यान गटविकास अधिकारी लता मोहिते, पेणचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रदीप सोलसकर आणि वनरक्षक गुलचंद काकडे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

९० दिवसांचा रोजगार मिळणार

वातावरण फाउंडेशनचे संस्थापक व सीईओ भगवान केसभट यांनी सांगितले की, बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्याने नेरे नानोसे, आपटवणे आणि असनेवाडी या तीन गावांमध्ये असे वनतलाव उभारले जात आहेत. यामुळे प्रत्येक गावातील १० कुटुंबांना तब्बल ९० दिवसांचा थेट रोजगार मिळणार असून, उदरनिर्वाहासाठी होणारे ग्रामीण स्थलांतर थांबण्यास मोठी मदत होईल.

१५ गावांत १०० सोलर स्ट्रीट लाइट्स

बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशनच्या प्रमुख श्रेया सुधीर यानी पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व सांगताना, सुधागड तालुक्यातील एकूण १५ गावांमध्ये १०० सोलर स्ट्रीट लाइट्स बसवण्यासाठी आर्थिक मदत देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली.

निवडक



कायदेविषयक जनजागृती शिबीर

कोर्लई : कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित मुरुडच्या वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयात 'सुरक्षित बचपन अभियान' अंतर्गत विशेष बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायदा जनजागृती शिबीर पार पडले. राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग आणि तालुका विधी सेवा समिती, तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. बालकांचे हक्क, त्यांचे संरक्षण आणि एका सुरक्षित समाजाची निर्मिती करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. यावेळी दिवाणी न्यायालयाचे वरिष्ठ लिपिक विकीत राऊत यांनी आपल्या मनोगतात शिबिराचा उद्देश व पार्श्वभूमी सांगितली. ॲड. डी.एन. पाटील यांनी मेरा बचपन, मेरा अधिकार आणि सुरक्षित क्लिक, सुरक्षित बचप या संवेदनशील विषयांवर मार्गदर्शन केले. त्यानंतर ॲड. फैसल जामदार यांनी अन्यायाविरुद्ध मौन बाळगणे हाही एक गुन्हा आहे, त्यामुळे कायदा जाणून घेणे आणि वेळीच बोलणे हाच त्यावरचा खरा उपाय आहे, असा संदेश दिला. तर ॲड. इकरा शेखानी यांनी 'ना बाल विवाह, ना बाल शोषण' आणि 'जागरूक बचपन, सशक्त भारत' या विषयांवर मार्गदर्शन केले.



विशेष मुलांची वैद्यकीय तपासणी

अलिबाग : लायन्स क्लब अलिबाग डायमंड आणि लायन्स क्लब मांडवा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२५) चोंढी येथील लायन्स पॅथॉलॉजी लॅबमध्ये विशेष मुलांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी व मार्गदर्शन वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या माध्यमातून परिसरातील विशेष मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. या विशेष शिबिरामध्ये ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक दिव्यांगत्व, मस्क्युलर डिस्ट्रॉफी, स्पायनल कॉर्ड इंज्युरी तसेच इतर विविध गंभीर न्यूरोलॉजिकल समस्यांनी प्रभावित असलेल्या तब्बल ४० बालकांची तज्ज्ञ वैद्यकीय पथकाकडून सखोल आणि मोफत तपासणी करण्यात आली. या उपक्रमासाठी नवी मुंबई येथील नामांकित न्यूरोजेन ब्रेन आणि स्पाइन इन्स्टिट्यूटचे विशेष वैद्यकीय व तांत्रिक सहकार्य लाभले. संस्थेच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थित बालकांची आस्थेने तपासणी करून त्यांच्या पालकांना पुढील उपचार, थेरपी आणि दैनंदिन काळजी घेण्याबाबत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. मुलांच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेऊन त्यांना योग्य ते वैद्यकीय सल्ले मिळाल्याने उपस्थित पालकांनी मोठा दिलासा व्यक्त केला.



शहीद पोलीस बांधवांना मानवंदना

खांदेश्वर : छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोलीस स्मृती दिनानिमित्त शहीद पोलीस बांधवांना भावपूर्ण मानवंदना देण्यात आली. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या पोलीस बँड पथकाने देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या पोलीस अधिकारी आणि जवानांच्या स्मृतींना अभिवादन केले. यावेळी पोलीस बँडच्या सुरांनी परिसरात गंभीर आणि भावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी देशभरात पोलीस स्मृती दिन पाळला जातो. कर्तव्य बजावताना देशाच्या सुरक्षेसाठी आणि नागरिकांच्या रक्षणासाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शौर्याचे स्मरण या दिवशी केले जाते. त्याच भावनेतून पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या पोलीस बँड पथकाने विविध राष्ट्रभक्तिपर धून सादर करून हुतात्मा पोलिसांना मानवंदना दिली. बँडच्या प्रत्येक सुरातून देशभक्ती, कर्तव्यनिष्ठा आणि बलिदानाची भावना व्यक्त होत होती. राष्ट्रगीताच्या सुरांनी उपस्थितांच्या मनात देशप्रेमाची भावना जागृत केली.



ज्येष्ठांसाठी मोफत आरोग्य शिबीर

अलिबाग : डॉ. सुभाष म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्र, अलिबाग आणि सुश्रुत हॉस्पिटलचे प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर साठ्ये यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२५) श्रीबाग येथील भारती दीनानाथ तरे सभागृहात ज्येष्ठांसाठी भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात सहभागी १०० ज्येष्ठ नागरिकांची शारीरिक तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार पुरवण्यात आले. याप्रसंगी उपाध्यक्ष डॉ. किरण नाबर, योगेश दीनानाथ तरे, सहसचिव प्रफुल्ल राऊत, खजिनदार डॉ. जगदीश थळे, सदस्य डॉ. सुरेश म्हात्रे, डॉ. प्रशांत जन्नावर, डॉ. अनिल डोगरे, ॲड. मनोज पडते, सल्लागार शरद कोरडे आदी पदाधिकाऱ्यांसह डॉ. कीर्ती साठ्ये, भारती तरे, ज्येष्ठ नागरिक संस्था अलिबागचे अध्यक्ष आर.के. घरत, माजी उपाध्यक्षा चारुशिला कोरडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी १८ ऑक्टोबर रोजी पॅरिसहून मुंबईला येणाऱ्या एअर फ्रान्सच्या (२१८) विमानात घडलेल्या या प्रसंगात डॉ. चंद्रशेखर साठ्ये यांच्या प्रसंगावधान, वैद्यकीय कौशल्य आणि वेळेवर केलेल्या उपचारांमुळे त्या प्रवाशाचे प्राण वाचवण्यात यश आले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल डॉ. चंद्रशेखर साठ्ये यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

निवडक



● (छायाचित्र : उदय कळस)

मनाली कुडेकर यांचा गौरव

म्हसळा : लहान मुलांचे बालपण समृद्ध करताना त्यांच्यावर संस्कारांची शिदोरी देणे, त्यांना शिक्षणाची गोडी लावणे आणि भावी आयुष्याचा पाया भक्कम करणे, हे काम अत्यंत जिव्हाळ्याचे आणि जबाबदारीचे असते. अंगणवाडी सेविका म्हणून तब्बल ३२ वर्षे अविरत सेवा बजावणाऱ्या मनाली कुडेकर यांनी हे कार्य निष्ठेने पार पाडले आहे. त्यांच्या या प्रदीर्घ सेवाकार्याचा यंदा रविप्रभा मित्रमंडळाच्यावतीने गौरव करण्यात आला. ज्याप्रमाणे कुंभार मातीच्या गोळ्याला आपल्या कुशल हातांनी आकार देऊन त्याला सुंदर रूप प्रदान करतो, त्याचप्रमाणे मनाली ताई यांनी दोन वर्षांच्या चिमुकल्यांपासून ते पाच वर्षांपर्यंतच्या अनेक बालकांना प्रेमाने घडविले. त्यांच्यावर चांगले संस्कार केले, शिस्त, स्वच्छता, एकमेकांशी मिळून-मिसळून राहण्याची सवय आणि शिक्षणाची आवड निर्माण केली. त्यांच्या मायेच्या स्पर्शातून आणि मार्गदर्शनातून अनेक बालकांच्या आयुष्याचा पाया घातला गेला. अंगणवाडीतील त्यांची सेवा ही केवळ शासकीय जबाबदारी न राहता बालकांच्या उज्ज्वल भविष्याची जडणघडण करणारी एक संस्कारयात्रा ठरली.

संघटना अध्यक्षपदी अक्षय जाधव

माणगाव : बैल व बैलगाड्यांचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या माणगाव तालुका बैलगाडा संघटनेच्या अध्यक्षपदी अक्षय जाधव, तर उपाध्यक्षपदी सज्जाद डावरे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. माणगाव तालुक्यातील





मांगवली येथे शनिवारी (दि.२४) आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्याने बैलगाडा संस्कृतीच्या जतनासाठी आणि संघटनेच्या बळकटीकरणासाठी एकजुटीचा संदेश मिळाला. या निवडी नंतर माणगाव तालुका बैलगाडा संघटनेच्या सचिवपदी दिलीप वाढवळ, सहसचिवपदी ज्ञानेश्वर गुगले, खजिनदारपदी दिलीप नवगणे, तर कार्याध्यक्षपदी जगदीश खानविलकर यांची निवड करण्यात आली. तसेच सल्लागार म्हणून मुख्तयार डावरे, उदय डाळ, कल्पेश खरात, वासुदेव गुगले, बाबू पाखुर्डे आणि तुषार करकरे अशी कार्यकारणी निवडण्यात आली.



निवृत्तीनंतरच्या आयुष्याला 'आदर्श कट्टा'

खांदेश्वर : आयुष्यभर कुटुंबासाठी धावपळ करून मुलांना वाढवले, संस्कार दिले आणि त्यांच्या संसाराला आकार दिला. मात्र, निवृत्तीनंतर स्वतःसाठी जगायचे कधी, हा प्रश्न अनेकांसमोर उभा राहतो. खांदा कॉलनीतील 'आदर्श कट्टा'च्या ज्येष्ठ मित्रांनी या प्रश्नाचे उत्तर मैत्रीतून शोधले आहे. वयाच्या या टप्प्यावरही उत्साहाने जगण्याची उमेद जपणारा हा कट्टा निवृत्तीनंतरच्या आयुष्याला आनंदाची नवी किनार देतो. खांदेश्वर सरोवर परिसरात दररोज भेटणाऱ्या या मित्रगटाची सुरुवात सुमारे १५ वर्षांपूर्वी झाली. सुरुवातीला सात-आठ मित्र एकत्र आले; पुढे या गप्पांच्या मैफलीचे रूपांतर एका मोठ्या कुटुंबात झाले. आज आदर्श कट्ट्यात सुमारे ३० सदस्य आहेत. अध्यक्ष मारुती पाटील आणि उपाध्यक्ष मारुती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा मित्रपरिवार सहवासातील आनंद अनुभवत आहे. या कट्ट्यावर केवळ गप्पा होत नाहीत, तर सुख-दुःखही मोकळेपणाने व्यक्त केले जाते. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले हे मित्र शिक्षक, बीएआरसी, अग्निशमन दल, पोलीस खाते, मुंबई महापालिका तसेच खासगी क्षेत्रात काम करून सेवानिवृत्त झाले आहेत. नोकरीच्या काळातील जबाबदाऱ्यांनंतर आता त्यांना एकमेकांसाठी वेळ देता येतो.

सायबर गुन्हेगारीविरोधात जनजागृती

पनवेल : ऑनलाइन व्यवहार आणि सोशल मीडियाचा वाढता वापर लक्षात घेता सायबर गुन्हेगारीपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती करणे गरजेचे बनले आहे. याच उद्देशाने नवीन पनवेल येथील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाच्या एलएल.बी. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी आसुडगाव येथील स्वामी समर्थ मठात सायबर गुन्हेगारीविरोधात जनजागृती कार्यक्रम आयोजित केला. गुरुवारी (दि.२२) झालेल्या या उपक्रमातून स्वामी भक्तांना ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार, डिजिटल सुरक्षितता आणि मोफत कायदेशीर मदतीविषयी महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पोस्टर्सच्या माध्यमातून ऑनलाइन आर्थिक फसवणूक, सोशल मीडियावरील गोपनीयता, सुरक्षित डिजिटल व्यवहार आणि सायबर गुन्ह्यांची तक्रार करण्याची प्रक्रिया याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. इंटरनेटचा वापर करताना अनोळखी लिंकवर क्लिक करणे, संशयास्पद संकेतस्थळांवर व्यवहार करणे किंवा वैयक्तिक माहिती शेअर करणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२

● नोकरीची सुवर्णसंधी! - अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!, ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक, आकर्षक पगार, नोकरीचे ठिकाण: अलिबाग, रायगड मुलाखतीसाठी आजच संपर्क साधा! ९९२३७५०५३९/९१०५७१७०३८ इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा! चांगल्या पगारासह नोकरीची उत्तम संधी!

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

तळोजात लिफ्ट कंत्राटावरून वाद



- गोळीबारात झाल्याने परिसरात खळबळ
- दोघेजण गंभीर जखमी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील तळोजा फेज-२ येथील शिवाजी चौक परिसरात लिफ्ट मेंटेनन्सच्या कंत्राटावरून आणि जुन्या आर्थिक व्यवहारांच्या हिशोबावरून वाद झाला. या वादाचे पर्यवसान थेट गोळीबारात झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दोन गटांतील वाद विकोपाला गेल्यानंतर लोखंडी रॉड आणि बांबूने मारहाण करण्यात आली, त्यानंतर पिस्तुलातून गोळ्या झाडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत विशाल शिंदे आणि सचिन डांगे हे दोघे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित दोन्ही गट पूर्वी भागीदारीत लिफ्ट मेंटेनन्सची कामे घेत होते. मात्र, आर्थिक मतभेदांमुळे त्यांच्यात फूट पडली. त्यानंतर नवीन कंत्राट मिळविणे आणि जुन्या देणी-घेणीचा हिशोब यावरून पुन्हा वाद उफाळून आला. या वादातून मारहाण आणि गोळीबाराचा गंभीर प्रकार घडल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी तळोजा पोलिसांनी सागर डांगे, आकाश डांगे, गणेश लावरे, अनिकेत नरवाडे आणि रुद्र बारवकर यांच्यासह अन्य तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे. तसेच, फरार आरोपींचा शोध सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून केला जात आहे.

लिफ्ट मेंटेनन्सच्या कंत्राटावरून झालेल्या वादात थेट गोळीबारापर्यंत मजल जात असेल, तर आर्थिक वर्चस्वाच्या संघर्षातून निर्माण होणाऱ्या हिंसाचाराकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शहराचा विस्तार, बांधकाम व्यवसायातील वाढते व्यवहार आणि कंत्राटांसाठी निर्माण होणारी स्पर्धा यांसोबत कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिला पाहिजे; सामान्य नागरिकांच्या मनात भीती निर्माण होता कामा नये. तळोज्यातील घटनेचा निष्पक्ष आणि सखोल तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करणे, बेकायदा शस्त्रांचा स्रोत शोधणे आणि संभाव्य गुन्हेगारी टोळ्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा, वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना न झाल्यास पनवेल तालुक्यातील शांतता आणि सुरक्षिततेपुढील आव्हाने अधिक गंभीर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

तळोज्यातील गोळीबाराच्या घटनेने पनवेल, नवीन पनवेल, खांदेश्वर, कामोठे, कळंबोली आणि खारघर परिसरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. बांधकाम व्यवसाय, कंत्राटे, माथाडी व्यवहार आणि अन्य आर्थिक हितसंबंधांच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या हस्तक्षेपाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. हत्येचा प्रयत्न, गंभीर मारहाण आणि अन्य गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तींच्या हालचालींवर प्रभावी नियंत्रण ठेवणे ही पोलिसांसमोरील महत्त्वाची जबाबदारी आहे. अशा व्यक्तींचा गुन्हेगारी टोळ्यांशी संबंध आहे का, बेकायदा शस्त्रे बाळगली जात आहेत का आणि आर्थिक वादांतून हिंसाचार घडविण्याची तयारी सुरू आहे का, याची सखोल पडताळणी होणे आवश्यक आहे.

सह्याद्री वाचवण्यासाठी काँग्रेस मैदानात

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जतमधील जंगलतोड रोखण्यासाठी आणि सह्याद्री वाचवण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ हे गुरुवारी (दि.२८) कर्जत येथे येणार आहेत.तर मराठा नेते मनोज जरांगे पाटील हेदेखील बुधवारी (दि.२७) कर्जतमध्ये येऊन पाहणी करणार असून, दोघेही आपली भूमिका स्पष्ट करणार आहेत.

कर्जत तालुक्यात सायडोंगर येथे हायड्रॉलिक पॉवर प्रकल्पासाठी हजारो झाडे तोडली जात आहेत. त्याविरुद्ध देशभर रान पेटले असून, स्थानिकांनी जोरदार आक्षेप घेतला आहे. त्यामुळे आता राष्ट्रीय काँग्रेसकडून वरिष्ठ पातळीवर दखल घेतली गेली आहे. पक्षाचे



नेते राहुल गांधी यांनी, बोगस परवानग्या बनवून पुढे नेले जाणारे प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही. जंगलाचा पर्यावरणाचा ऱ्हास देखील होऊ देणार नाही, अशी भूमिका स्थानिक पातळीवर जाऊन जाहीर करावी, अशा सूचना प्रदेश काँग्रेसला देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ हे गुरुवारी कर्जत येथे येत असून, प्रत्यक्ष जंगलात जाऊन पाहणी करणार आहेत.त्यानंतर माध्यमांपुढे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची भूमिका जाहीर करणार आहेत. तत्पूर्वी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून कर्जत प्रांत अधिकारी, तहसीलदार आणि पोलीस प्रशासन यांना जंगलतोड आणि टोरंट प्रकल्पाला विरोध करणारे पत्र तालुकाध्यक्ष संजय गवळी यांनी सादर केले. त्यावेळी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष दिनानाथ देशमुख, पक्षाचे युवक पदाधिकारी सुरज पंडित, लिलाधर देवळे, विजय हरिश्चंद्र, ऋषिकेश पवार आदी उपस्थित होते. तसेच, बुधवारी मराठा नेते मनोज जरांगे पाटील हे कर्जत येथे येत आहेत. सकाळी नऊ वाजता कर्जत येथून पाली सायडोंगरकडे प्रयाण करणार आहेत. सायडोंगर भागात जंगलतोडीची पाहणी करून सकल मराठा समाज कडून पाठिंबा आणि भूमिका जाहीर करणार आहेत. सकल मराठा समाजाने मनोज जरांगे पाटील यांच्या दौऱ्याची जोरदार तयारी सुरू केली असून, मोठ्या प्रमाणावर मराठा समाज येथे पोहचेल असे बोलले जात आहे.

अण्णासाहेब सावंत बँकेचा वर्धापन दिन

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

रायगडसह इतर जिल्ह्यातील एक प्रतिथयश नागरी सहकारी बॅक लि. दि अण्णासाहेब सावंत को-ऑप.नागरी सहकारी बँकेची महाडबाहेर पहिलीच शाखा २७ ऑक्टोबर, १९७३ रोजी श्रीवर्धन येथे स्थापन झाली. त्यानंतर कै.शं.बा. तथा दादासाहेब सावंत, कै. सुधाकरराव तथा अण्णासाहेब सावंत व अन्य सहकाऱ्यांच्या अथक प्रयत्नांनी बँकेच्या शाखांचा विस्तार व प्रगती वाढतच राहिली. १९७३ साली श्रीवर्धन शाखा सुरु करण्यासाठी कै. अण्णासाहेब सावंत यांना काँग्रेसचे तत्कालीन जेष्ठ नेते कै. काशिनाथ तथा काकासाहेब जोशी यांचे मोठे सहकार्य लाभले होते. त्यानंतर कै. काकासाहेब हेही सुमारे बारा वर्षे या बँकेचे संचालक होते. दि.२७ ऑक्टोबर हा बँकेच्या श्रीवर्धन शाखेचा स्थापना दिन असल्याने बँकेचे शाखाधिकारी सुमंत पाठक व कर्मचारी वर्गाने कै. काकासाहेब जोशी यांचे चिरंजीव आनंद जोशी यांना बँकेत आमंत्रित करुन त्यांचा सत्कार केला.

चार कुटुंबांना वाळीत टाकण्याचा प्रकार

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

भारत देश स्वतंत्र होऊन जवळजवळ ८० वर्षे पूर्ण होत असतानाही गावागावांमध्ये असलेल्या शुल्लकवादाचे रूपांतर वाळीत टाकण्याच्या प्रकारामध्ये आजही घडत आहेत. त्यामुळे ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. अशीच घटना श्रीवर्धन तालुक्यातील शिरवणे गावात घडली आहे. येथील अखंड संघर्ष प्रतिष्ठान मंडळाने गावातील विनोद चिमण यांना एका शुल्लक कारणावरून वाळीत टाकण्याचा प्रकार घडला होता.

मंडळाची बैठक झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून गावातल्या लोकांनी विनोद चिमण यांच्या कुटुंबियाजवळ बोलणे किंवा संबंध ठेवणे बंद केले. त्यानंतर विनोद चिमण यांचे मित्र अमरदीप पवार, शेखर शिंदे व नरेश धाडवे हे विनोद चिमण यांच्याबरोबर संबंध ठेवून असल्यामुळे त्यांच्याशी देखील कोणीही बोलू नये, असे ठरविण्यात आले. याबाबत विनोद चिमण यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये रीतसर अर्ज दाखल केला असून, अद्यापपर्यंत पोलीस प्रशासनाकडून या अर्जावरती कोणत्याही प्रकारे चौकशी करण्यात आलेली नाही. हा प्रकार घडल्यानंतर गावच्या पोलीस पाटलांना विनोद चिमण यांनी याची लेखी कल्पना दिली होती. परंतु, पोलीस पाटलांनी सुद्धा या प्रकाराकडे दुर्लक्ष केल्यामुळे आपल्यावर झालेल्या अन्यायाला न्याय मिळावा यासाठी विनोद चिमण यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये तक्रार अर्ज दिला आहे.

आमराई उद्यानात सापाचे दर्शन

| पनवेल | प्रतिनिधी |

नवीन पनवेल सेक्टर १४ येथील आमराई उद्यानात साप दिसल्याने नागरिकांमध्ये काही काळ उत्सुकता निर्माण झाली. उद्यानातील सुरक्षा रक्षक महेंद्र पाटील यांनी प्रसंगावधान राखत सर्पमित्र प्रथमेश मालुसुरे यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच घटनास्थळी दाखल झालेल्या सर्पमित्राने चपळाईने सापाला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. त्यानंतर सापाला सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार असल्याची माहिती सर्पमित्र प्रथमेश मालुसुरे यांनी दिली. या घटनेत सुरक्षा रक्षक महेंद्र पाटील यांनी दाखवलेले प्रसंगावधान आणि सर्पमित्राने केलेली त्वरित कारवाई कौतुकास्पद ठरली.

मेंढपाळांनी धरला कोकणचा रस्ता

| आगरदांडा | प्रतिनिधी |

एल निनोच्या प्रभावामुळे देशभरासह महाराष्ट्रातीलही अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती असल्याने तेथील अनेक मेंढपाळांनी यंदा लवकरच कोकणाची वाट धरली आहे. यंदाच्या दुष्काळामुळे पिण्यासाठी पाणी, जनावरांसाठी चारा आणि कुटुंबियांसाठी अन्नधान्यांची वानवा निर्माण झाली आहे. त्यामुळे उदर निर्वाह करण्यासाठी घाटमाथ्यावरील मेंढपाळांनी आता हिरवाईने नटलेल्या कोकणाकडे आपला मोर्चा वळवला आहे.

घाटमाथ्यावरील पुणे, सातारा, भोर, लोणंद इत्यादी भागांतील मेंढपाळ आपल्या शेकडो मेंढ्या, बाकऱ्या, घोडे, कुत्रे आणि कोंबड्यांसह आपापल्या कुटुंबियांना सोबत घेऊन कोकणाकडे कुच करीत आहेत. शेतजमीनीच्या मालकाशी बोलणी करून धान्य अथवा रोख रकमेच्या मोबदल्यात



● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

हे मेंढपाळ त्या शेतकऱ्याच्या शेतात आपले तंबू ठोकून तेथेच आपली मेंढरे आणि बकऱ्यांना रात्रभर बसवतात. त्यांच्या मलमुत्राचा फायदा शेतकऱ्यांना नैसर्गिक सेंद्रिय खतासारखा होतो. परिणामी शेतीच्या उत्पादनात वाढ होते. म्हणून कोकणातील शेतकरी देखील त्यांची उत्सुकतेने वाट पाहत असतात. मात्र, यंदा कोकणातही पावसाने फारशी हजेरी न लावल्याने सप्टेंबर, ऑक्टोबर महिने कोरडे गेल्याने भातपीक धोक्यात आले आहे. अनेक शेतकऱ्यांनी आपली शेती अद्याप कापली नसल्याने, तसेच कित्येकांनी आपली शेतजमीनी ओसाड टाकली असून, पिण्याच्या पाण्याचीही टंचाई जाणवत असल्याने या मेंढपाळांचे यावर्षी काय होणार, असा प्रश्न त्यांच्यासह शेतकऱ्यांना पडला आहे.

बंद कालवा सुरू करण्याची मागणी

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

गेल्या बारा वर्षांपासून बंद असलेला कालवा पुन्हा सुरू करून शेतीसाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी ग्रुप ग्रामपंचायत माजगाव आणि ग्रामस्थांच्यावतीने कर्जत येथील वरिष्ठ लिपिक पाटबंधारे विभाग अधिकारी भगवान कदम यांना निवेदन देण्यात आले. कालव्याचे पाणी लवकरात लवकर उपलब्ध झाल्यास परिसरातील शेतीला नवसंजीवनी मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

खरसुंडी येथील बंधाऱ्यातून कालव्याद्वारे पौध, माजगाव, आंबिवली आणि वारद या गावांपर्यंत पाणी पोहोचत होते. या पाण्याच्या माध्यमातून पूर्वी परिसरात मोठ्या प्रमाणावर भातशेती केली जात होती.



मात्र, गेल्या बारा वर्षांपासून कालवा बंद असल्याने शेकडो हेक्टर जमीन पाण्याअभावी पडीक पडली आहे. परिणामी, शेतीचे नुकसान होत असून, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. यंदा उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली. कालव्याला पाणी सुरू झाल्यास भातशेतीला पुन्हा चालना मिळेल, परिसर हिरवागार होईल आणि पाणीटंचाईचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्यास मदत होईल. यासाठी ग्रामस्थांनी सकारात्मक भूमिका घेत प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे. दरम्यान, कालव्याची दुरवस्था आणि अतिक्रमणांची पाहणी करून योग्य नियोजनाद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचविण्याचे आश्वासन पाटबंधारे विभागाकडून देण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. यावेळी मा. सरपंच गोपीनाथ जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जयवंत पाटील, मा. उपसरपंच राजेश पाटील, नरेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते मारुती ढवालकर, एस के. कांबळे, गौतम कांबळे, जयेश पाटील, रणधीर पाटील, अतुल लबडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

कोट्यवधींचा खर्च, तरी गटारं उघडीच

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

पनवेल महापालिका हद्दीत गटारींवरील झाकणांच्या कामावर होणाऱ्या खर्चाबाबत प्रश्न उपस्थित होत असतानाच नवीन पनवेल सेक्टर ११ मधील मिराज सिनेमासमोरील गटारीचे झाकण उघडे असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पादचारी, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिका प्रशासनाने या प्रकाराकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात गटारींवर झाकणे बसविण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, दुसरीकडे गटारी उघड्या अवस्थेत दिसत असल्याने या कामांची गुणवत्ता आणि देखभाल याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. गटारींच्या झाकणांच्या कामात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप विरोधी पक्षनेत्यांनी केला असून, संबंधित माहिती मिळविण्यासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावल्याचेही सांगितले जात आहे. या आरोपांची सत्यता तपासणे आवश्यक असले, तरी प्रत्यक्षातील उघड्या गटारींची समस्या दुर्लक्षित करून चालणार नाही. विशेषतः रात्रीच्या वेळी अंधारात किंवा पावसामुळे गटार लक्षात न आल्यास अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी महापालिकेने तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

दुष्काळावर मात करण्यासाठी लोकचळवळ | **गांधारी नदी खोऱ्यात जलसंवर्धनाचा जागर**

विद्यार्थी बनणार 'ग्रीन सर्जन'

| महाड | प्रतिनिधी |

गांधारी नदी खोऱ्यात यंदा केवळ ८० टक्के पाऊस झाल्याच्या पार्श्वभूमीवर, संभाव्य पाणीटंचाई आणि दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंवर्धनाची एक मोठी लोकचळवळ उभी करण्यात येत आहे. या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'गांधारी नदी परिक्रमा, संवाद यात्रा'ची सांगता सोमवारी (दि.२६) मोहोप्रे येथील रायगड कॉलेज ऑफ फार्मसी येथे उत्साहात पार पडली.

हिरवळ प्रतिष्ठान, महाड यांच्या पुढाकाराने आणि ग्राम विकास केंद्र नाते, रायगड शैक्षणिक संकुल तसेच विविध ग्रामपंचायतींच्या सहकाऱ्याने दि.२० ते २५ ऑक्टोबरदरम्यान या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या ६ दिवसांच्या प्रवासात ग्रामस्थ, युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये जलसंवर्धनाबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली. पूनाडे (कोंडरान) येथून सुरू झालेली ही यात्रा कोंझर, कोथुर्डे, खर्डी, चापगाव, तळोशी, नांदगाव बुद्रुक, नाते, कोकरे, घुरूप कोंड, पारवाडी, आचळोली या गावांतून मार्गक्रमण करत मोहोप्रे येथे पोहोचली. या यात्रेचे नेतृत्व जलनायक किशोर धारिया यांनी केले.

यात्रेदरम्यान पाणी बचत, पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविणे, वनराई बंधारे, कोकण विजय बंधारे आणि विशेषतः आदिवासी बांधवांनी त्यांचे पारंपरिक पद्धतीने बांधलेले साटी बंधारे, भूजल पुनर्भरण, तसेच विहिरी, झरे, तलाव आणि नदीचे संवर्धन यांसारख्या महत्त्वाच्या उपाययोजनांवर ग्रामस्थांशी थेट संवाद साधण्यात आला. ग्रामस्थांनी आपल्या भागातील स्थानिक पाणीसमस्या मांडत जलसंवर्धनासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, इतकेच नव्हे तर विविध गावांमध्ये प्रत्यक्ष श्रमदानालाही सुरुवात झाली आहे.

निसर्गसंवर्धनासाठी कार्य करण्याची शपथ

यात्रेच्या सांगता सोहळ्यात अनेक शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी नदी व निसर्गसंवर्धनासाठी 'ग्रीन सर्जन' म्हणून कार्य करण्याची शपथ घेतली. नदीच्या आरोग्याला बाधा आणणाऱ्या समस्या ओळखून त्यावर उपाययोजना करणे, प्रदूषण रोखणे आणि जलसंवर्धनाच्या कामांत सक्रिय सहभागी होणे, हा या संकल्पनेचा मुख्य उद्देश आहे. ''करा पूर्वतयारी, जी दुष्काळ निवारी; माझी नदी आहे, माझी जबाबदारी!'' या मुख्य संदेशातून जलसंवर्धनासाठी लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. ग्रामस्थांचे श्रमदान, विविध संस्थांचे सहकार्य आणि युवकांचा ऊर्जेचा वापर करून गांधारी नदी खोऱ्यात जलसंवर्धनाची लोकचळवळ अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.



ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकती आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री. हरदेवसिंग सुखदयालसिंग धिंडसा याचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत या निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण इ. स्वरुपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकती या निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्रंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळवावे.

मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्रफळ (हे.आर)	आकार (रु.पैसे)	विद्यमान मालकाचे नाव
मौजे पाझर ता.अलिबाग	६७	१.६८	२.५०	श्री.हरदेवसिंग सुखदयालसिंग धिंडसा
	६६/२	०.२२	०.३४	श्री.हरदेवसिंग सुखदयालसिंग धिंडसा

अलिबाग
दिनांक: २७/१०/२०२६

ॲड. निखिल चव्हाण
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.७०५७५२०३९८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून आमचे अशिल यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

मौजे :- शेलु, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-

मालकांचे नाव	स.नं./ प्लॉट नं.	क्षेत्र : हे.आर.चौ.मीटर	आकार
१.राहूल विजय पनवेलकर, २.सीमा विजय पनवेलकर,	१४०/७	३.५६.००	३५.६०
विजय रामचंद्र पनवेलकर,	१४०/८	५.९६.००	५९.६०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता : सदनिका क्रं. १०८,
पहिला मजला, विंग बी, लक्ष्मी अपार्टमेंट
बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण: कर्जत

सही /-
ॲड.सुर्यकांत भाऊ मसणे,
दिनांक : २८/१०/२०२६
मो.नं. ९९२२१५५१५३

जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे-वैजनाथ, ता-कर्जत, जि -रायगड येथील मिळकती, त्या मिळकतीचे मालक श्री.जोसेफ पत्राव यांच्याकडून कायम खरेदीखताने घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

नविन सर्व्हे. नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी	आकार रू. पै.
६९/३/ब	०.५४.४० पैकी लिहुन देणार यांच्या मालकीचे व ताबेकब्जा वहीवाटीचे खाते नं.११११ चे संपूर्ण क्षेत्र ०.२०.००	४.६२ १.९७

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास, तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि: २८/१०/२०२६

वकील
ॲड. सचिन संजय सुर्वे
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, विद्यमान जमीन मालक, १) नरेंद्र हरिश्चंद्र लोंगले, २) शारदाबाई हरिश्चंद्र लोंगले, ३) करूणा हरिश्चंद्र लोंगले उर्फ दमयंती दामोदर कुरंगळ, ४) वैजयंती ज्ञानेश्वर जाधव उर्फ प्रतिभा ज्ञानेश्वर जाधव, ५) शैला गोविंद मसणे उर्फ सुगंधा गोविंद मसणे, ६) बकुळा विलास मसकर, ७) शोभा भास्कर पाटील, ८) माणिक गोपीनाथ शेलार उर्फ मनिषा गोपीनाथ शेलार, ९) राजेश्री राजेंद्र लोंगले, १०) प्रथमेश राजेंद्र लोंगले व ११) पियुष राजेंद्र लोंगले, यांच्या कायदेशीर हिश्श्याची त्यांच्या ताबेकब्जातील, वहीवाटीतील, त्यांच्या मालकी हक्कात असलेली खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करणेचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

जमीन मिळकतीचे वर्णन
मौजे गारपोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील

भूमापन क्र.	उपविभाग	लावणी लायक हे.आर.चौ.मी.	क्षेत्र पोटखराबा हे.आर.चौ.मी.	एकूण हे.आर.चौ.मी.	आकार रू.पै.
५३		०-६२-२०	०-०६-१०	०-६८-३०	२.८१

सदरील संपूर्ण क्षेत्राच्या जमीन मिळकतीपैकी ० हे.२० आर. ०० चौ.मी. क्षेत्राची जमीन मिळकत ही विक्री व्यवहाराच्या विषयाची मिळकत आहे.

वरील वर्णनाच्या जमीनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहीवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/१०/२०२६

ॲड. अतुल तुकाराम भोपी
कार्यालय :-१०४, साई लिला, माणेक नगर को-ऑप. हौ.सोसायटी समोर, महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, ४१०२०६.
मो. नं. ९३२४६७९५०७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस जाहीर नोटीसद्वारे कळवण्यात येते कि, श्री. नरीमन मॅकी डॉक्टर (वडील: श्री. मॅकी कावसजी डॉक्टर); रा.: नवयुग चेंबर्स, ग्रँट रोड, मुंबई ४०००০७ यांना भाडेपट्ट्यावर देण्यात आलेल्या भूखंडाचे अधिकार, लाभ आणि हक्क, नोंदणीकृत विक्री दस्तऐवजाद्वारे प्राप्त करण्याचा माझ्या अशिलांचा मानस आहे.

वाटप केलेल्या भूखंडाचे वर्णन

प्लॉट क्र.MP५९, सिटी सर्व्हे क्र.२००, बेल्व्हेडिअर पॉइंट, वन ट्री हिल रोड, माथेरान, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र, भारत येथे स्थित, १०,००० चौ. मीटर क्षेत्रफळाची जमीन आणि त्यावर असलेली सर्व बांधकामे.

तरी, सबब वर नमूद जमीन मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा समझोता करार, दावा, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठे करार, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज, कोर्ट केस, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत, (सोमवार ते शनिवार) स.११ वा. पासून सा. ५ वा. पर्यंत, कागदोपत्री पुराव्या सोबत लेखी तक्रार सादर करावी, किंवा रजिस्टर पोस्ट द्वारे खालील कार्यालयीन पत्त्यावर पाठवावी, अन्यथा आमच्या अशील ह्यांचा हा करार हा अश्या कोणत्याही दाव्यांचा संदर्भ घेतल्याशिवाय पूर्ण होईल, वर नमूद मिळकत हि निर्वेध बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही, असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील आणि त्यानंतर कोणतेही हरकत आल्यास आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, ह्याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि. : २६ ऑक्टोबर २०२६

सही/-
ॲड. हृषीकेश जोशी
८०९, नेमीनाथ हाईटस
कर्जत रायगड
मो.९६७३८९४००५

जाहीर सूचना

सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, अमचे अशील हे खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत, सर्व प्रभार, धारणाधिकार व भार यांपासून मुक्त अशा संबंधित मालमत्ता असलेल्या मोजमापित ००-५३-६० एच. ए. क्षेत्रफळाच्या जमिनीच्या भागाची तिच्या मालकांकडून मालकी तत्वावर खरेदी करण्याच्या प्रक्रियेत आहेत.

तथापि कोणाही व्यक्तीचा यासंदर्भात सदर मालमत्तेमध्ये विक्री, उत्तराधिकार, ताबा, वारसा, गहाण, धारणाधिार, भाडेकरार, भेट वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, दावा वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात सहाय्यक दस्तावेजांसम वेत लिखित स्वरूपात सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ७ दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरितांना सूचित करावे अन्यथा अशा कोणाही व्यक्तीचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही व तो अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येईल आणि आमचे अशिल तो पूर्ण करण्याच्या प्रक्रियेत असून तो व्यवहार पूर्ण करतील व तत्पश्चात कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही.

मालमत्तांची अनुसूची

गाव रांजणपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड, राज्य महाराष्ट्र येथील गट क्र. १०२ धारक रु. १२.९४ पैसे मूल्यावर करनिर्धारित मोजमापित ००-५३-६० एच. ए. क्षेत्रफळाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, पंचायत समिती अलिबाग यांच्या हद्दीतील आणि नोंदणीकरण जिल्हा रायगड व उपजिल्हा अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील.

मुंबई
दिनांक - २७.१०.२०२६

अलाथिया लॉ एलएलपी
वकील व सॉलिसिटर्स
१२२, १२ वा मजला, मित्तल टॉवर-सी,
नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१.

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना सदर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागांव, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील ०-११-६८ हे. आर एवढे क्षेत्र सदर मिळकतीचे विद्यमान मालक मेहान किन्नर नायक, रा. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू.पै.)
नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड	२१५९/२	एकूण ०-६५-००	२१-२५

वर नमूद मिळकतींपैकी ०-११-६८ हे. आर, आकार रु. ३-८३ पै. हे क्षेत्र तरी वरील मिळकतीचे योग्य संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर येणारी मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. वेदस्तु प्रशांत राणे
पत्ता : कार्यालय क्र. २०५, दुसरा मजला, कॉमर्स हाऊस, १४०,
नागदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई - ४०००२३.
संपर्क: ८६५५५१३१५०
ई-मेल : adv.vedasturane@yahoo.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मोजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक १) श्री. कुणाल बाळकृष्ण मोरे २) श्री. बाळकृष्ण भिकन मोरे ३) श्री. भारती बाळकृष्ण मोरे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

सर्व्हे नं	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार
४०	१०	०-२०-००	०-१९

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/१०/२०२६

ॲड. विलास रमेश लाड
ऑफीस : १०१/१, वसंत पॅराडाइस,
१ ला मजला, कोतवाल नगर,
ता.कर्जत, जि.रायगड
मो.९३२५६७७९७९

अलिबाग येथील मे. उपविभागीय अधिकारी सो. यांचे कोर्टात

विलंब माफी अर्ज नं.१३५/२०२५

नोटिस

१. श्री. मंगेश सुरेश जाधव
रा. खंडेराव पाडा, खंडोबा मंदिराजवळ, थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड

अपिलार्थी

२. श्री कृष्णा सुरेश जाधव
रा. ३०१, कोपर रोड, आंबा भवानी मंदिरासमोर गुरूदत्ता को. ऑ.हौ.सो.विष्णु नगर डोंबिवली वेस्ट कल्याण ठाणे ४२१ २०२

३. श्रीमती अनुजा अनुप नागवेकर
रा. गणेश मंदिराजवळ, नागाव शास्त्रीनगर, ता. अलिबाग, जि. रायगड

४. श्री जगदीश सुरेश जाधव
रा रूम नं. ४०२ शशी उदय सोसायटी कोपर रोड, अंबा भवानी मंदिरासमोर विष्णु नगर, डोंबिवली वेस्ट कल्याण, ठाणे

५. श्रीमती सिमा सुरेश जाधव
रा. रूम नं.८ पहिला मजला, कोपर रोड, अंबा भवानी मंदिरासमोर विष्णु नगर, डोंबिवली वेस्ट, कल्याण,ठाणे

विरूद्ध

१. श्री. सुरेश भालचंद्र परकर
२. श्री. सुधीर भालचंद्र परकर
दोघेही रा. मु. थेरोंडा, ता. अलिबाग जि. रायगड

उत्तरार्थी

३. श्रीमती शुभदा शशिकांत नार्वेकर
४. श्रीमती क्षितीजा शशीकांत आंबेरकर
वय वर्षे, व्यवसाय - गृहिणी
नं. ३ व ४ सर्व रा. खंडेरावपाडा, खंडेराव मंदीराजवळ, थेरोंडा, पो. चौल, ता.अलिबाग, जि.रायगड

५. श्रीमती मनिषा श्रीकांत वैद्य उर्फ मनिषा केसरीनाथ चव्हाण
रा.थेरोंडा, पो.चौल, ता.अलिबाग, जि.रायगड

६. श्रीमती समिधा सुबोध भोसले
७. श्री. प्रथमेश परशुराम बाजी
नं. ६ व ७ दोघेही रा. चौल, चुनेकोळीवाडा, ता. अलिबाग जि. रायगड

८. तलाठी सजा रेवदंडा
ता. अलिबाग, जि. रायगड

अपिलार्थी यांनी मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्र. व उप विभाग १४२/२/ब, क्षेत्र ०-२४-३० हे.आर. आकार १७.४७ रू. पैसे या मिळकती संदर्भात फेरफार नोंद क्र. १३५५१, १७६७८, व १८६२९ विरूद्ध या न्यायालयात विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे.

प्रस्तुत विलंब माफीच्या अर्जाचे कामी दिनांक ०२/११/२०२६ रोजी मा.न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली आहे. सदर सुनावणीस उपरोक्त तारखेस व वेळी आपण स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत उपस्थित राहुन आपले म्हणणे सादर करावे. सदर दिवशी व वेळी आपण गैरहजर राहिल्यास आपल्याला काहीही सांगावयाचे नाही असे गृहित धरून नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय घेतला जाईल याची नोंद घेण्यात यावी.

ठिकाण- अलिबाग
दिनांक २७/१०/२०२६

डि.एम.महाले
नायब तहसिलदार
उप विभागिय अधिकारी कार्यालय
अलिबाग, उपविभाग अलिबाग

जाहिर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील शेती गट नं. ३३७/१ चे विद्यमान जमीन मालक श्री. निखील मधुसूदन शहा यांचे नावे असलेली तांबे - कब्जातील तसेच मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपैकी काही क्षेत्र, आमचे अशिलांनी कायम स्वरुपात खुषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड

गावाचे नाव	भूमापन नं. /गट नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु.पैसे
आगरसुरे	३३७/१	जिरायत २.१९.२९ वरकस ०.३१.३० पो.ख. ०.२४.७० एकूण २.७५.२९	२६.८७

वरील वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे आहे. तसेच सदर मिळकतीचा (Legal Search) सर्च काढून आम्ही मिळकतीची पडताळणी करणार आहोत.

तर सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्यूपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकती वर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २७/१०/२०२६

सही/-
ॲड. रश्मी आर. शिंदे
सरीता सदन, जे. एस. एम. कॉलेज रोड,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो. नं. +९१ ८३८०८०८००२,
ई-मेल - adv. rashmishinde11@gmail.com

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

मौजे नागांव, ता. अलिबाग, जि रायगड येथील भुमापन क्रमांक २४५९, क्षेत्र १-३४-६० (हे.आर.), आकार ४७ रु. ८७ पैसे या बागायती मिळकतीपैकी ०-०५-५७ (हे.आर.), आकार ०२ रु.०५ पैसे ही बागायती मिळकत, मिळकतीचे विद्यमान कबजेदार आदिती अमोल मटकर व निवेदिता मारुती वाळूंज यांचे खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची आहे. सदर मिळकतीपैकी आदिती अमोल मटकर यांचा असलेला अविभक्त हिस्सा व त्यात असलेले ग्रामपंचायत नागांव ता. अलिबाग घर नंबर ३४५३ क्षेत्र २३५० चौ. फुट ही मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक कबजेदार आदिती अमोल मटकर यांजकडून आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी मिळकतीचे विद्यमान कबजेदार व आमचे अशिल यांच्यात झालेली आहेत. सदर मिळकतीची मालकी व ताबा कबजा मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार आदिती अमोल मटकर यांचाच आहे, असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज फरोक्त, अन्न वस्त्राचा बोजा वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ''पंधरा'' दिवसांचे आत खालील सही करणार ''खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट'' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा मिळकतीचे विद्यमान कबजेदार आदिती अमोल मटकर यांचाच आहे, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. २८/१०/२०२६

सही/-
ॲड. श्रद्धा प्रदीप वैद्य
''नागेश्वर भुवन'' गणपती आळी, मु.पो.नागांव,
ता.अलिबाग, जिल्हा रायगड.
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक स्मीता संभाजी बासरे, ज्योती सतीश मंडावले, सतीश रामचंद्र मंडावले, रीता संदिप बासरे यांचेकडून विकसनासाठी घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन मौजे. नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

सर्व्हे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र (चौ.मी.)	आकार (रू.पै.)
३९७	४	४१०-००	४१-००

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल विकसनाचा करारनामा पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २७/१०/२०२६

ॲड.सुमित दत्तात्रेय कराळे.
पत्ता-ममदापुर नेरळ
ता.कर्जत, जि.रायगड
मो.-९१६८९७८४३८.

दिनांक : २५/१०/२०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक जितेंद्र भालचंद्र देवरूखकर वगैरे, श्री रविंद्र वसंत देवरूखकर यांच्या कडुन कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी त्यांनी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

मिळकतीचा तपशिल

अनु. क्र	मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र हे.आर	आकार रू. पै
१)	चोंढी ता.अलिबाग	१३०	०-३३-००	१.१२
२)	चोंढी ता.अलिबाग	१२६	०-१६-७०	२.२५
३)	चोंढी ता.अलिबाग	१०६	०-३०-२०	६.३३

वर वर्णन केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकांचे असणारे अविभाज्य असे क्षेत्र हे या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

सदर वर वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालकांची खुद्द मालकीची व ताब कब्जा वहीवाटीची तसेच निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही ताबा कब्जा, कुळवहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, वहिवाट अथवा अन्य कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग :
दिनांक २७/१०/२०२६

सही,
ॲडव्होकेट
ॲड. कांचन प्रशांत नार्वेकर
मु.ॲकॉन क्लासिक, फ्लॅट नं.१०६,
जिल्हा न्यायालय रायगड समोर अलिबाग, रायगड
मो. ९८५०७५०८३४

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे मालक श्री. अनंता विष्णु म्हसे रा. अंजप, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे अंजप, ता. कर्जत, जि. रायगड.

स.नं./हि.नं.	क्षेत्र हे. आर. पॉ.	आकार (रू.पै.)
४६/१०	एकुण क्षेत्र ०-१२-४०	०-१०

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळवावे.

ठिकाण: कर्जत
दिनांक: २८/१०/२०२६

सही/-
ॲड. गणपत का. फुलावरे   ॲड. गीतांजली जी. फुलावरे
कार्यालय पत्ता : ''मधुतारा बिल्डींग'' गाळा नं. ३
कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ८८८८०४५३७६/७७७५९९३०८८

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)
स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा माणगाव चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजेच कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २८/११/२०२० रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०९/०९/२०२१ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री.गणेश बाळू शिर्के व सहकर्जदार श्री.आकाश गणेश शिर्के यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१.०८.२०२० पर्यंतची रक्कम रूपये २४,९८,४९६/- व दिनांक ०१.०९.२०२० पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत वसूली अधिकारी यांनी दिनांक १७/०९/२०२१ रोजी जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून गाव निजामपूर, सिटी सर्व्हे माणगाव तालुका माणगाव, जि.रायगड येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये.

आणि सदर मिळकतीशी कोणत्याही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा माणगावच्या दिनांक ३१.०८.२०२० रोजी येणे रक्कम रूपये २४,९८,४९६/- व त्यावरील दिनांक ०१/०९/२०२० पासूनचा व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

मिळकतदाराचे नाव :- श्री.गणेश बाळू शिर्के

अ.क्र	गावाचे नाव	मिळकत क्रमांक	क्षेत्र	आकार
१	निजामपूर ता.माणगाव	१०९/२(बिनशेती)	२१.००.००	२१०.००

स्थळ : माणगाव
दिनांक : २४.१०.२०२६

सही/-
श्री.एस.जी.शिर्के
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड द्वारा
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे आक्षी, ता, अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची बागायत जमिन मिळकत १. सौ. अपर्णा सुर्यकांत जोगळेकर, २. श्री. अभिजीत सुर्यकांत जोगळेकर, ३. सौ. राजश्री किरण सरपोतदार, सर्वजण रा. मु. शिंत्रे गल्ली, पो. आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील बागायत जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी)	आकार (रु.पै.)
आक्षी, ता. अलिबाग	५१६/२	बागायत ०-७८-०० पो.ख. ०-०२-०० एकूण क्षेत्र ०-८०-००	१६.०५

वर नमूद मिळकतीमधील १. सौ. अपर्णा सूर्यकांत जोगळेकर, २. श्री. अभिजीत सूर्यकांत जोगळेकर, ३. सौ. राजश्री किरण सरपोतदार यांच्या सामाईक मालकीचे क्षेत्र ०-०५-७० हे.आर, पो.ख. ०-०२-०० हे. आर. एकूण क्षेत्र ०-०७-७० हे. आर. आकार १.१७ रू. पै. प्लॉट नं. ९ ही बागायत मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक २७/१०/२०२६

सही/-
ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर
मु. शिंत्रे गल्ली, पो. आक्षी,
ता. अलिबाग, जि. रायगड
खरेदीदाराचे वकील
मोबा. नं. ९०११३६२८६७

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना सदर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागांव, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील ०-११-६४ हे. आर एवढे क्षेत्र सदर मिळकतीचे विद्यमान मालक मेहेक किन्नर नायक, रा. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू.पै.)
नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड	२१५९/२	एकूण ०-६५-००	२१-२५

वर नमूद मिळकतींपैकी ०-११-६४ हे. आर, आकार रु. ३-८२ पै. हे क्षेत्र तरी वरील मिळकतीचे योग्य संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर येणारी मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. वेदस्तु प्रशांत राणे
पत्ता : कार्यालय क्र. २०५, दुसरा मजला, कॉमर्स हाऊस, १४०,
नागदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई - ४०००२३.
संपर्क: ८६५५५१३१५०
ई-मेल : adv.vedasturane@yahoo.com

निवडक

हारिस रऊफ भडकला

नवी दिल्ली : पाकिस्तान, इंग्लंड आणि श्रीलंका या तीन संघांमध्ये तिरंगी एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यातील लाहोरमध्ये झालेल्या सामन्यात मैदानावर मोठा वाद पाहायला मिळाला. पाकिस्तानचा गोलंदाज हारिस रऊफ आणि इंग्लंडचा विल जॅक्स यांच्यात शाब्दिक चकमक झाली. दोघांमधील वाद वाढत असल्याचे पाहून इंग्लंडचा जो रूट आणि मैदानावरील पंचांना मध्यस्थी करावी लागली. दरम्यान, या सामन्यात पाकिस्तानने इंग्लंडवर एक गडी राखून थरारक विजय मिळवला. ही घटना पाकिस्तानच्या डावातील ४६व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर घडली. इंग्लंडचा गोलंदाज सॅम करनने शादाब खानला बाऊन्सर टाकला. त्यावेळी शादाब ९० चेंडूंत ९९ धावांवर खेळत होता. चेंडू उंच गेल्याने त्याने पंचांकडे वाइडसाठी विचारणा केली. मात्र, पंचांनी वाइड दिला नाही. याचदरम्यान, नॉन-स्ट्रायकर एंडला उभा असलेला हारिस रऊफ जवळ क्षेत्ररक्षण करत असलेल्या विल जॅक्सशी वाद घालताना दिसला. दोघांमध्ये नेमकं काय बोलणे झाले, हे स्पष्ट झाले नाही. मात्र, वाद वाढल्यानंतर हारिस रऊफ हातात बॅट घेऊन विल जॅक्सच्या दिशेने आक्रमकपणे जाताना दिसला. परिस्थिती चिघळू नये म्हणून पंचांनी हस्तक्षेप केला. त्याचवेळी जो रूटही धावत आला आणि त्याने हारिसला बाजूला नेले. सामना संपल्यानंतरही दोघांमधील तणावाची चर्चा सुरू राहिली. पाकिस्तानने विजय मिळवल्यानंतर हारिस रऊफ आणि विल जॅक्स यांच्यात पुन्हा संवाद झाल्याचे वृत्त आहे.

चिन्मय सुतारची ऐतिहासिक खेळी

मुंबई : रणजी चषकाच्या दुसऱ्या फेरीतील सामन्यात मिझोरामकडून खेळणाऱ्या चिन्मय सुतारने ऐतिहासिक खेळी साकारली. त्याने नागालँडविरुद्ध नाबाद ४०० धावा फटकावल्या. रणजी चषकाच्या इतिहासात अशी कामगिरी करणारा तो दुसराच फलंदाज ठरला आहे. ७७ वर्षांनी रणजी चषकात एका डावात एकाच फलंदाजाने ४०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. रणजी चषकाच्या ९२ वर्षांच्या



इतिहासात अशी कामगिरी फक्त दुसऱ्यांदा घडली आहे. याआधी बीबी निंबाळकर यांनी रणजी चषकाच्या एका डावात ४०० धावा करण्याचा पराक्रम केला होता. १९४८-४९मध्ये काठियावाडविरुद्ध महाराष्ट्राकडून खेळताना नाबाद ४४३ धावा केल्या होत्या. यावेळी चिन्मय सुतारने सुरुवातीला संयमी फलंदाजी केली; मात्र, नंतर फटकेबाजी करत धावा वसूल केल्या. त्याने ६ व्या गड्यासाठी १६८ धावांची भागिदारी केली. मिझोरामचे ९ गडी बाद झाल्यानंतर शेवटच्या गड्यासोबतही चांगली भागिदारी करत ४०० धावांचा टप्पा गाठत विक्रम नोंदवला. क्रिकेटचं बाळकडू चिन्मयला घरातूनच मिळाले आहे. त्याच्या वडिलांनीही क्रिकेटमध्ये चमक दाखवली होती. राजेश सुतार हे १९९०च्या दशकात मुंबई क्रिकेटमध्ये षटकार मारण्यासाठी ओळखले जात होते. मुंबईकडून ७ रणजी चषकातील सामने आणि ३० लिस्ट ए सामने खेळले आहेत. मुंबईकडून ते १९९८मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामन्यात खेळले होते. तेव्हा स्टीव्ह वॉ आणि शेन वॉर्नच्या संघाला हरवले होते.

केरॉन पोलार्डचा मोठा निर्णय

मुंबई : मुंबई इंडियन्सने इंडियन प्रीमिअर लीग २०२७ हंगामासाठी केरॉन पोलार्डची मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती केली आणि त्यानंतर लगेचच त्याने मोठा निर्णय घेतला आहे. आगामी २० हंगामात जॉबर्ग सुपर किंग्सकडून खेळता येणार नसल्याचे पोलार्डने



संघ व्यवस्थापनाला कळवले आहे. एएए-२० लीगमध्ये पोलार्ड मुंबई इंडियन्स फ्रँचायझीची साथ सोडून जॉबर्ग सुपर किंग्सच्या ताफ्यात यंदाच दाखल झाला होता; परंतु, त्याने आता त्यांच्याकडून खेळण्यास असमर्थता दर्शवली आहे. जॉबर्ग सुपर किंग्स ही चेन्नई सुपर किंग्सच्या मालकीच्या समूहाशी संबंधित फ्रँचायझी आहे. मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाचीच केपटाऊन ही याच स्पर्धेतील फ्रँचायझी आहे. मुंबई इंडियन्स संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी औपचारिकपणे नियुक्ती झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, त्रिनिदादच्या खेळाडूने जोहान्सबर्गस्थित फ्रँचायझीकडून खेळण्यास असमर्थता कळवली. पोलार्डच्या निर्णयामुळे दोन फ्रँचायझीमध्ये होणारा गोंधळ टळला आहे.

सौरभ हंबीरचा राज्यस्तरीय डंका

पाली/गोमाशी : वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र यांच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय खेल कूद स्पर्धेत सुधागड तालुक्यातील चेरफळवाडी येथील सौरभ हंबीर याने घवघवीत यश संपादन केले आहे. मुंब्रा येथील मैदानावर झालेल्या या स्पर्धेत सौरभने ४०० मीटर



धावणे आणि लांब उडी या दोन्ही क्रीडा प्रकारात सर्व जिल्ह्यांतील स्पर्धकांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकाविला. या दमदार कामगिरीच्या जोरावर त्याची ओडिशा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सौरभच्या या यशामागे त्याचे वडील हरिकेश हंबीर यांची अथक मेहनत आणि प्रोत्साहन आहे. तसेच, महाराष्ट्र पोलीस दलातील अरुण वाक हे सौरभला लागणारे क्रीडा साहित्य पुरवून मोलाची मदत करत आहेत. खेळाप्रती असलेली त्याची जिद्द आणि चिकाटीमुळेच तो आज या उंचीवर पोहोचला आहे. सौरभच्या या यशाबद्दल उद्धर पंचक्रोशी आणि संपूर्ण सुधागड तालुक्यातून त्याचे कौतुक होत आहे.

तिलकने धोनीला टाकले मागे

नवी दिल्ली : तिलक वर्माने न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात पुन्हा एकदा स्वतःला सिद्ध केले. त्याने अवघ्या २६ चेंडूंत ५१ धावांची सामना जिंकून देणारी खेळी केली. या कामगिरीसह, तिलक वर्मा एका विशेष यादीत माजी कर्णधार एमएस धोनीच्या पुढे गेला आहे. या यादीत 'किंग' विराट कोहली अव्वल स्थानी असून, ज्या भारतीय फलंदाजांनी टी-२० क्रिकेटमध्ये किमान ५०० धावा केल्या आहेत आणि त्या धावांचा पाठलाग करताना त्यांच्या फलंदाजीच्या सरासरीवर आधारित आहे. आता या यादीत विराट कोहलीनंतर तिलक वर्मा दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर, माजी कर्णधार एमएस धोनी तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे.



वेलिंग्टनमध्ये धावांचा 'अभिषेक'

- किवी गोलंदाजांना फोडला घाम
- तिसरा सामना जिंकून मालिका खिशात



। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अभिषेक शर्माने न्यूझीलंडच्या गोलंदाजांना मैदानावर सावरण्याची संधीच दिली नाही. अभिषेकने अवघ्या ३८ चेंडूंत ११३ धावांची वादळी खेळी साकारली. त्याच्या या स्फोटक शतकाच्या जोरावर भारताने न्यूझीलंडने दिलेल्या १९९ धावांच्या लक्ष्याचा अवघ्या १३ षटकांत यशस्वी पाठलाग केला. या विजयासह भारतीय संघाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत ३-० अशी विजयी आघाडी घेत मालिका आपल्या नावावर केली.

वेलिंग्टनमध्ये भारत आणि न्यूझीलंड यांच्यात मंगळवारी (दि.२७) तिसरा टी-२० सामना खेळवला गेला. यावेळी भारतीय कर्णधाराने नाणेफेक जिंकून यजमानांना प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. मात्र, भारतीय गोलंदाजांनी दुसऱ्याच षटकात पहिला बळी घेत चांगली सुरुवात केली. त्यानंतर मात्र डॅरिल मिचेलने न्यूझीलंडच्या डावाला चांगली साथ दिली. त्याने नाबाद ८९ धावांची खेळी केली. त्याच्या या खेळीच्या जोरावर न्यूझीलंडने २० षटकांत ३ बाद १९८ धावा केल्या.

त्यानंतर १९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी भारताकडून वैभव सूर्यवंशी आणि अभिषेक शर्मा सलामीला मैदानात उतरले. दोन्ही सलामीवीरांनी चौफेर फटकेबाजी करत न्यूझीलंडच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. मागील सामन्यात वैभवला फारशी कमाल करता आली नव्हती. या सामन्यात मात्र वैभवने सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी केली. त्याने अवघ्या १९ चेंडूंत ४५ धावांची खेळी केली. दुसऱ्या बाजूला अभिषेक शर्मान न्यूझीलंडच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई करत अवघ्या ३८ चेंडूंत ११३ धावांची तुफानी खेळी केली. पॉवरप्लेमध्ये भारताने एकही गडी न गमावता ११८ धावा केल्या. या जबरदस्त सुरुवातीमुळे भारताचा विजय जवळपास निश्चित झाला होता. अभिषेक शर्माच्या तुफानी शतकामुळे भारताने १९९ धावांचे लक्ष्य अवघ्या १३.२ षटकांत ४ गडी गमावून गाठले.

भारतीय संघाने जागतिक विक्रम मोडले

अभिषेक व वैभव या जोडीने या सामन्यात जागतिक विक्रम मोडले. पहिल्या षटकात २६ धावा कुटून आंतरराष्ट्रीय टी-२०तील सर्वात महागडे पहिल्या षटकाच्या जागतिक विक्रमाशी बरोबरी केली. त्यानंतर या जोडीने अवघ्या १४ चेंडूंत पन्नास धावा पूर्ण केल्या आणि टी-२०तील सर्वात वेगाने ५० धावा करणारा भारत हा पूर्ण सदस्य असलेल्या संघांमध्ये अव्वल ठरला. त्यानंतर अभिषेकने १५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. सलामीला आलेल्या वैभवनेही उत्तुंग षटकार खेचून संघाला ५ षटकांत शतकी पल्ला गाठून दिला. आंतरराष्ट्रीय टी-२०तील क्रिकेटमध्ये संघाचे हे वेगवान शतक ठरले. तसेच, भारताने पहिल्या ६ षटकांत ११८ धावा केल्या आणि या पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील पॉवर प्लेमधील सर्वाधिक धावा ठरल्या.

३८ चेंडूत वादळी खेळी

वैभव सूर्यवंशी बाद झाल्यानंतर अभिषेक शर्माने धावांचा धडाका सुरूच ठेवला. त्याने अवघ्या ३८ चेंडूंत ११३ धावांची तुफानी खेळी केली. त्याच्या खेळीत ९ चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता. त्याचा स्ट्राइक रेट तब्बल २९७.३६ इतका राहिला. अभिषेकने चौफेर फटकेबाजी करत न्यूझीलंडच्या गोलंदाजांना अक्षरशः जेरीस आणले. १० व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर जेव्हा अभिषेक बाद झाला, तेव्हा भारताची धावसंख्या १७८ होती. तत्पूर्वी अभिषेकने अवघ्या १५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. मात्र, अर्धशतकावर न थांबता त्याने आपली आक्रमक फलंदाजी सुरूच ठेवली आणि शतक झळकावले. हे त्याच्या आंतरराष्ट्रीय टी-२० कारकिर्दीतील चौथे शतक ठरले.

आयुष बडोनीचे सलग दुसरे द्विशतक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

दिल्लीचा कर्णधार आयुष बडोनीने रणजी करंडक स्पर्धेत आपला शानदार फॉर्म कायम ठेवला आहे. मंगळवारी (दि.२७) रांची येथे झारखंडविरुद्धच्या तिसऱ्या फेरीच्या सामन्यादरम्यान त्याने सलग दुसरे द्विशतक झळकावले. बडोनीने दुसऱ्या दिवसाच्या खेळात केवळ २१६ चेंडूंमध्ये १९ चौकार आणि ३ षटकारांच्या जोरावर आपले द्विशतक पूर्ण करत पुन्हा एकदा दिल्लीच्या फलंदाजीचे नेतृत्व केले.

२६ वर्षीय बडोनीने सलग दोन प्रथम श्रेणी डावांमध्ये द्विशतके



झळकावणाऱ्या २१ भारतीयांच्या यादीत आपले नाव जोडले आहे. गेल्या आठवड्यात पालम येथील एअर फोर्स ग्राऊंडवर दिल्लीच्या पहिल्या घरच्या सामन्यात, बडोनीने गुजरातविरुद्ध २१७ धावांची कारकिर्दीतील सर्वोत्तम खेळी केली. बडोनीने दिल्लीचे महान खेळाडू गौतम गंभीर आणि विराट कोहली यांच्या पंक्तीत स्थान मिळवले आहे, ज्यांनी दोन डावांमध्ये दोन द्विशतके झळकावली आहेत. प्रथम श्रेणी क्रिकेटच्या इतिहासात कोणत्याही फलंदाजाने दोनपेक्षा जास्त वेळा हा पराक्रम केलेला नाही. सलग दोन सामन्यांत द्विशतक झळकावणारे पहिले खेळाडू के.एस. रणजितसिंहजी होते, ज्यांच्या नावावरून प्रतिष्ठित रणजी करंडकाला नाव देण्यात आले. रणजितसिंहजी हे एकमेव भारतीय आहेत ज्यांनी १९०० आणि १९०१ मध्ये सलग द्विशतके झळकावून दोनदा हा पराक्रम नोंदवला आहे.

पनवेलच्या क्रिकेटला गतवैभव मिळणार

। पनवेल । प्रतिनिधी ।

एकेकाळी संपूर्ण रायगड जिल्ह्यात दबदबा निर्माण करणाऱ्या पनवेलच्या क्रिकेटला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी शहरात आधुनिक क्रिकेट मैदान विकसित करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. पनवेल महानगरपालिकेच्या महासभेत मांडण्यात आलेल्या या प्रस्तावानुसार, प्रभाग समिती 'ड' अंतर्गत प्रभाग क्रमांक १४ मधील भूखंड क्रमांक ५०८ (पार्ट) आणि ५२० (पार्ट) येथे क्रिकेट मैदान उभारण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे १ कोटी २६ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.



नगरसेवक सुमित उल्हास झुंजारराव यांनी या मैदानासाठी पुढाकार घेतला आहे. एकेकाळी पनवेलच्या क्रिकेटविश्वात सोसायटी, युनिटी, नानू फूलवाद, हरिओम, नवज्योत, स्पॅर्श, इलेव्हन फायटर आणि मंगलमूर्ती यांसारख्या संघांनी आपला ठसा उमटवला होता. मिडल क्लास सोसायटी आणि व्ही. के. स्कूलच्या मैदानांवर नियमित सराव करून अनेक गुणवंत खेळाडू घडले. मात्र, वाढते शहरीकरण आणि मैदानांची कमतरता यामुळे क्रिकेट सरावासाठी उपलब्ध जागा कमी होत गेल्या. परिणामी, स्थानिक खेळाडूंना दर्जेदार सराव सुविधा मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. प्रस्तावित मैदानात आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी झुंजारराव यांनी केली आहे.

रोहित स्पष्टच बोलला

नवी दिल्ली : भारताचा अनुभवी फलंदाज रोहित शर्माला २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकात खेळायचे आहे. ही त्याच्या कारकिर्दीतील शेवटची आयसीसी स्पर्धा असण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्या स्पर्धेसाठी तो कठोर परिश्रम घेत आहे. नुकतेच रोहितने मस्करीमध्ये २०२७ विश्वचषकात खेळायचे असेल तर मला कर्णधार गिलला खूश ठेवावे लागेल, असे म्हटले. त्याच्या या विधानाचा व्हिडिओ व्हायरल झाला असून, चाहत्यांनी त्याचा पुरेपूर आनंद घेतला आहे.

वैभवनंतर आशीर्वादचा जलवा

। समस्तीपूर । वृत्तसंस्था ।

१५ वर्षांचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने आपल्या आक्रमक फलंदाजीने क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतल्यानंतर आता त्याचा धाकटा भाऊ आशीर्वादही चर्चेत आला आहे. बिहारमधील समस्तीपूर येथे झालेल्या स्थानिक १५ वर्षांखालील क्रिकेट सामन्यात आशीर्वादने धावांचा पाऊस पाडत शानदार खेळी केली. त्याने अवघ्या ११९ चेंडूंत १६८ धावा ठोकल्या. आशीर्वादने एका स्थानिक स्पर्धेत ऋषभ-११ गंगापूर संघाकडून



खेळताना ही शानदार खेळी केली. त्याने ११९ चेंडूंमध्ये १६८ धावा केल्या. त्याच्या या खेळीत १९ चौकार आणि ६ षटकारांचा समावेश होता. आशीर्वादच्या फलंदाजीतून आक्रमकता आणि मोठे फटके मारण्याची क्षमता दिसून आली. त्याने गोलंदाजांवर दबाव कायम ठेवला आणि सातत्याने धावा करून संघाला मजबूत स्थितीत आणले. आशीर्वादने यापूर्वी क्रिकेट अकादमी ताजपूरसाठी एका स्थानिक सराव सामन्यात शतक झळकावले होते. त्या सामन्यात आशीर्वादने ८७ चेंडूंमध्ये १०३ धावा केल्या होत्या. त्याच्या या खेळीत २० चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. या कामगिरीनंतर त्याचा मोठा भाऊ, वैभव सूर्यवंशीने सोशल मीडियावर आपला आनंद व्यक्त केला होता.

सीएसकेने दिला दिग्गजांना नारळ



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

चेन्नई सुपर किंग्ज संघ सध्या एका मोठ्या बदलातून जात आहे. आयपीएल २०२७ च्या मिनी-लिलावापूर्वी, फ्रँचायझीने आपल्या कोचिंग स्टाफमध्ये मोठे बदल करण्यास सुरुवात केली आहे. सर्वप्रथम, त्यांनी मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांच्याशी संबंध तोडले आणि त्यानंतर फलंदाजी प्रशिक्षक मायकल हसी यांनीही संघ सोडला. मात्र, हे बदल इतक्यावरच थांबले नाहीत. चेन्नई सुपर किंग्जने आपल्या कोचिंग स्टाफमधील आणखी चार सदस्यांना कार्यमुक्त केले आहे.

चेन्नई सुपर किंग्जने गोलंदाजी प्रशिक्षक एरिक सायमंड्स, सहाय्यक प्रशिक्षक राजीव कुमार, टॉमी सिमसेक आणि ग्रेग किंग यांच्याशी संबंध तोडले आहेत. सायमंड्स २०१८ पासून संघासोबत होते आणि त्यांनी संघाचा गोलंदाजी विभाग बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. राजीव कुमार यांनी गेल्या अनेक वर्षांत संघाची तयारी, खेळाडूंचा विकास आणि एकूण कामगिरीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. टॉमी सिमसेक हे २००८ मध्ये आयपीएलच्या पहिल्या हंगामापासून पडद्यामागून काम करत होते. खेळाडूंना तंदुरुस्त ठेवणे आणि त्यांना सामन्यांसाठी तयार करणे ही त्यांची मुख्य जबाबदारी होती. तसेच, ग्रेग किंग यांनी संघाचे 'स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग कोच' म्हणून काम केले. खेळाडूंना शारीरिकदृष्ट्या सक्षम ठेवण्यात आणि प्रत्येक हंगामात ते आपली सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी सज्ज असतील याची खात्री करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले.

गार्गी सरनाईकची सुवर्णभरारी; आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

। अलिबाग । प्रतिनिधी ।

गुजरातमधील वापी येथे दि.१० व ११ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय लाठी-काठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील नागाव येथील पीएनपी सायरस पूनावाला सीबीएसई स्कूलमधील यूकेजीमध्ये शिकणाऱ्या गार्गी सरनाईक हिने आपल्या कौशल्याची चमक दाखवत दोन सुवर्णपदकांवर नाव कोरले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर तिची इंडोनेशियातील बाली येथे होणाऱ्या आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

गार्गी हिने आठ वर्षांखालील वयोगटात सहभाग घेत द्विलाठी आणि द्विअनीका या दोन्ही प्रकारांत अव्वल स्थान पटकावले. लहान वयातच लाठी-काठी या पारंपरिक युद्धकलेत तिने मिळवलेले हे यश कौतुकास्पद असून, तिच्या जिद्दीची, मेहनतीची



आणि कौशल्याची साक्ष देणारे आहे. तिला लाठी-काठीचे प्रशिक्षण प्रशिक्षिका प्रियांका गुंजाळ यांच्याकडून मिळाले. गार्गीने आपल्या शाळेचा, पालकांचा आणि रायगड जिल्ह्याचा नावलौकिक उंचावला आहे. आता आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी तिला मिळणार असल्याने तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गार्गीच्या या दैदीप्यमान कामगिरीबद्दल संस्थेच्या संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका गीतिका भूचर, शिक्षक आणि शिक्षकवृंदासह विविध स्तरांतून तिचे अभिनंदन करण्यात येत असून, बाली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतही ती अशीच चमकदार कामगिरी करून देशासाठी यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

खेळाडूंवर होणार पैशांचा पाऊस | **यंदा गोव्यात आयोजन**

आयपीएलचा मिनी-लिलाव डिसेंबरमध्ये

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयपीएल २०२७ साठी खेळाडूंच्या मिनी-लिलावाचे आयोजन दि.१६ डिसेंबर रोजी गोव्यात केले जाणार आहे. याआधी सर्व १० संघांना दि.१५ नोव्हेंबरपर्यंत आपल्या कोणत्या जुन्या खेळाडूंना संघात कायम ठेवणार आणि कोणाला रिलीज करणार, हे सांगावे लागणार आहे. त्यानंतर लिलाव सुरू होण्याच्या ठीक एक आठवडा आधी संघांना त्या खेळाडूंची अंतिम यादी आणि कोणत्या क्रमांकावर कोणाची बोली लागेल, याची संपूर्ण माहिती मिळणार आहे.

आयपीएल २०२६चा हंगाम संपल्यानंतर आयपीएलमध्ये



आतापर्यंत केवळ दोनच खेळाडूंची ट्रेड (देवघेव) झाली आहे. आयपीएलच्या नियमानुसार खेळाडूंच्या ट्रेडचा हा कालावधी हंगाम संपल्यानंतर ठीक एका महिन्याने सुरू होतो आणि लिलावाच्या एक आठवड्याआधीपर्यंत उघडा राहतो. त्यानंतर ही खिडकी पुन्हा उघडते आणि पुढील हंगाम सुरू होण्याच्या ठीक एका महिन्याआधीपर्यंत सुरू राहते. याच वर्षी जूनमध्ये, लखनऊ सुपर जायंट्स संघाने आपला कर्णधार ऋषभ पंतला दिल्ली कॅपिटल्सला दिले आणि त्याच्या बदल्यात मनगटी फिरकीपटू (रिस्ट स्पिनर) कुलदीप यादवला आपल्या संघात समाविष्ट करून घेतले. याशिवाय नुकतेच, दिल्लीने आपला वेगवान गोलंदाज टी नटराजनला सनरायझर्स हैदराबादला दिले आणि त्याच्या जागी युवा लेग-स्पिनर झीशान अन्सारीला आपल्या संघात घेतले आहे. त्याने अद्याप आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेले नाही. तो एक अनकॅप्ड खेळाडू आहे.

आयपीएलने अद्याप २०२७ च्या हंगामाच्या निश्चित तारखांची घोषणा केलेली नाही. तथापि, २०२४ मध्ये पुढील तीन हंगामांच्या तारखा सांगताना १४ मार्च ते ३० मे दरम्यानचा काळ निश्चित करण्यात आला होता. परंतु, यावर्षी सप्टेंबरमध्ये बीसीसीआयच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीनंतर मंडळाचे सचिव देवाजीत सैकिया यांनी संकेत दिले होते की ही स्पर्धा मार्चच्या शेवटी सुरू होऊ शकते. तसेच, मागील तीन आयपीएल लिलाव देशाबाहेर पार पडले होते. या लिलावांमध्ये संघांचे मालक, अधिकारी, कोचिंग स्टाफ आणि खेळाडूंची निवड करणाऱ्या प्रतिनिधींना उपस्थित राहावे लागते. एवढ्या सर्व लोकांसाठी परदेशात जाऊन राहणे, हॉटेल बुक करणे, वाहनांची व्यवस्था करणे आणि बाकी खर्च उचलणे केवळ अत्यंत महागडेच पडत नाही, तर त्यांचे नियोजन करणे देखील खूप गुंतागुंतीचे काम असते; विशेषतः मिनी-लिलावासाठी मेगा-लिलावाच्या तुलनेत खूप कमी खेळाडूंना खरेदी करायचे असते. तसेच, आयपीएल २०२८ पूर्वी मेगा-लिलावाचे आयोजन केले जाणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028

दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.

■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर

(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)